७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. ०४ जुलै २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये


# तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता दूध सम्राटांकडे

## 'फार्म टू प्लेट' कडक नियमावली लागू, उल्लंघन केल्यास परवाने रद्द करण्याचा इशारा

मुंबई (दै. संध्या)



राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईचे सत्र सुरूच असून, हॉटेल, बेकरी आणि पनीर विक्रेत्यांनंतर आता त्यांनी आपला मोर्चा राज्यातील 'दूध सम्राटांकडे' वळवला आहे. दुग्धजन्य पदार्थांमधील वाढती भेसळ आणि ग्राहकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवण्यासाठी मुंढे यांनी राज्यात 'सेव्ह फूड, सेव्ह ड्रग' ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत दूध संकलनापासून ते थेट ग्राहकांच्या ताटात जाईपर्यंतच्या संपूर्ण पुरवठा साखळीसाठी अत्यंत कडक नियमावली जाहीर करण्यात आली आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, दुधातील भेसळ आणि कृत्रिम दुधाचा सुळसुळाट रोखण्यासाठी संपूर्ण 'इकोसिस्टम' बदलणे गरजेचे आहे. त्यानुसार जारी करण्यात आलेले नवे आदेश हे 'दूध संकलन केंद्रे आणि दूध शीतकरण केंद्रे, दूध प्रक्रिया आणि पॅकेजिंग करणारे उद्योग, किरकोळ विक्रेते आणि बल्क (घाऊक) दूध विक्रेते, पनीर, खवा, लोणी, क्रीम, चीज आणि आईस्क्रीमचे उत्पादन व विक्री करणारे व्यावसायिक' यांना बंधनकारक असतील.

हॉटेल आणि रेस्टॉरंट्सवर केलेल्या कारवाईचा दाखला देत आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दूध व्यवसायिकांना कडक इशारा दिला आहे. हॉटेल तपासणीदरम्यान अनेकांनी 'पेस्ट कंट्रोल' केल्याची केवळ खोटी प्रमाणपत्रे दाखवली होती, मात्र प्रत्यक्षात तिथे कोणतेही काम झाले नव्हते. अशा लबाडी करणाऱ्या हॉटेल्सचे परवाने एफडीएने तात्काळ रद्द केले आहेत.

"मला केवळ कागदावरचे नियम आणि प्रमाणपत्रे नको आहेत. जर दुग्ध व्यवसायाच्या ठिकाणी प्रत्यक्ष नियमांचे पालन झाले नाही, तर कोणतीही पूर्वसूचना न देता थेट व्यावसायिक लायसन्स (परवाना) रद्द केले जाईल," असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. "आदेशाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण वाढ करणे, प्रामाणिक दुध व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि राज्यात आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे हा आहे. राज्यभर करण्यात आलेल्या तपासण्या, निरीक्षण, नमुना विश्लेषणे अंमलबजावणी कारवाईतून दूध पुरवठा साखळीच्या विविध टप्पावर काही गंभीर त्रुटी सातत्याने निदर्शनास आल्या.

### धक्कादायक प्रकार

- दुधामध्ये पाण्याची भेसळ करणे.
- रसायनांचा वापर करून कृत्रिम दूध तयार करणे आणि विकणे.
- दुधात युरिया, डिटर्जेंट, कॉस्टिक सोडा, स्टार्च, ग्लुकोज आणि मेलामाईन यांसारख्या मानवी आरोग्यास घातक रसायनांचा वापर.
- मिल्क फॅट आणि एसएनएफ मानकांचे सर्रास उल्लंघन.
- दूध साठवणूक आणि वाहतुकीदरम्यान शीतसाखळीचे पालन न करणे.
- विनापरवाना किंवा प्रशासनाकडे नोंदणी न करता व्यवसाय चालवणे.
- उत्पादनांवर चुकीचे लेबलिंग करून ग्राहकांची दिशाभूल करणे.
- कोल्ड ड्रिंगवर उत्पादनावर 'एनर्जी ड्रिंक' असे लिहायचे नाही

# दापोली, खेड, मंडणगडमधील प्रलंबित ऊर्जा कामांना गती द्या

मुंबई (दै. संध्या)



रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली, खेड आणि मंडणगड तालुक्यांतील वीज वितरण, पायाभूत सुविधा आणि प्रलंबित कामे कालमर्यादित पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कामे करावीत असे निर्देया ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या. दापोली येथील उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. यासाठी सकारात्मक प्रस्ताव पाठवावा. तसेच समुद्र किनाऱ्याजवळील जुन्या वीज वाहक लाईन रस्त्यालगत घेण्याबाबत राज्यमंत्री योगेश कदम यांनी सूचित केले.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली, खेड आणि मंडणगड तालुक्यांतील ऊर्जा विषयक कामांचा आढावा घेण्यात आला. बैठकीस गृह राज्यमंत्री योगेश कदम, महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढीकर संचालक डी. व्ही. पडळकर, सतीश चव्हाण, कोकण विभागाचे सह व्यवस्थापकीय संचालक जगदाळे, मुख्य अभियंता डोळे आणि कावळे यांच्यासह ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, दापोली, खेड, मंडणगड तालुक्यात वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी सुरू असलेली कामे, नवीन उपकेंद्रे, उच्च व लघुदाब वीजवाहिन्यांची उभारणी, रोहित्रांची उपलब्धता, कृषी व घरगुती वीज जोडण्यांशी संबंधित प्रकरणे तसेच नागरिकांकडून प्राप्त झालेल्या विविध मागण्या संवेदनशीलतेने हाताळून ही कामे विनाविलंब पूर्ण करावीत.

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, या भागात वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्यावर तातडीने उपाययोजना कराव्या. आवश्यक तेथे कव्हर कंडक्टर लावण्याची कार्यवाही करावी. नागरिकांना सुरक्षित आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यास राज्य शासन कटिबद्ध असल्याचे राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


# आदित्य ठाकरेंना महाराष्ट्रभर फिरवा म्हटलं होतं : बंडू जाधव

परभणी (दै. संध्या)



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला बसलेल्या सर्वात मोठ्या धक्क्यानंतर आता पक्ष सोडलेल्या खासदारांकडून एकामागोमाग एक भूमिका स्पष्ट केली जात आहे. शिंदे गटात प्रवेश केलेल्या सहा खासदारांपैकी परभणीचे खासदार संजय ऊर्फ बंडू जाधव यांनी पहिल्यांदाच सार्वजनिकरीत्या मौन सोडत पक्ष सोडण्यामागचं कारण स्पष्ट केलं आहे. उद्धव ठाकरेंविषयी वैयक्तिक नाराजी नसल्याचं सांगतानाच, संघटनेकडे झालेलं दुर्लक्ष आणि स्थानिक राजकारणामुळे हा निर्णय घ्यावा लागल्याचा दावा त्यांनी केला. सेलू येथे आयोजित सत्कार कार्यक्रमात बोलताना बंडू जाधव यांनी अनेक महत्त्वाचे खुलासे केले. विशेष म्हणजे, त्यांनी उद्धव ठाकरेंना आदित्य ठाकरे यांना राज्यभर फिरवण्याचा सल्ला दिला होता, असा दावाही यावेळी केला.

बंडू जाधव म्हणाले की, शिवसेनेत फूट पडू लागल्यानंतर पक्षातून एकामागून एक नेते आणि कार्यकर्ते बाहेर पडताना आम्ही स्वतः पाहत होतो. त्या काळात आपण स्वतः उद्धव ठाकरेंना भेटून स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं. "साहेब, तुमची तब्येत ठीक नसते. तुम्हाला संपूर्ण महाराष्ट्र फिरणं शक्य नसेल, पण किमान आदित्य ठाकरे यांना तरी राज्यभर पाठवा. त्यांनी संघटनेतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांना भेटावं. त्यांच्या भावना जाणून घ्याव्यात." मात्र, तसं झालं नाही. पक्ष संघटनेकडे दुर्लक्ष झालं आणि कार्यकर्त्यांशी संवाद तुटत गेला. त्याचाच परिणाम म्हणून अनेक नेते आणि पदाधिकारी पक्ष सोडून गेले, असा दावा त्यांनी केला. आता काही लोक म्हणतात, संजय राऊतही म्हणतात की, पैसे भेटले म्हणून हे फुटले. पण पैसेच घ्यायचे असते तर मग 2022ला काय कमी पैसे मिळाले असते का? राहिलोच ना तेव्हा सोबत. पण 2022 नंतर पक्ष संघटना कमकुवत होत गेली, एका पाठोपाठ एक कार्यकर्ते, नेते जात राहिले. म्हणून स्थानिक कार्यकर्त्यांचा आग्रह आणि येथील विकास यासाठी आम्हाला हा निर्णय घ्यावा लागला.

# आरोग्य सेवेत कट प्रॅक्टिस व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही

मुंबई (दै. संध्या)



सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय यंत्रणेतील उपलब्ध सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित या बैठकीसाठी आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. आरोग्य मंत्री म्हणाले की, राज्यातील १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या सर्व प्रकरणाचा मागील सहा महिन्यांचा रेफरल डेटा तपासण्यात यावा. ज्या ठिकाणी अनियमितता आढळेल, तेथे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. रुग्णाला अनावश्यकपणे खासगी रुग्णालयात पाठविले जात असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याबाबत सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करावा.

राज्यातील प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहावी, यासाठी नियमित आणि प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. शासनाने आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही कामामध्ये दिरंगाई अथवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

'आरोग्य संवाद यात्रा'च्या माध्यमातून १५ जूनपासून राज्यभर प्रत्यक्ष पाहणी मोहीम राबविण्यात येत असून, उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये तसेच गावपातळीवरील आरोग्य समित्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाईल. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी.

गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देताना कालबाह्य समित्या कायम ठेवण्याचा प्रकार अजिबात सहन केला जाणार नाही असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. समित्यांमध्ये विद्यमान सरपंच व सदस्यांचा समावेश करून त्यांचे नियमित कामकाज सुरू ठेवणे ही संबंधित जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे.

ढिंग-टांग




## सरकारने म्हटले : राज्यात सर्वांसाठी अनिवार्य, प्रीपेड मीटर ऐच्छिक

# स्मार्ट मीटरवरून विधानसभेत खडाजंगी

मुंबई (दै. संध्या)



राज्यातील वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बंधनकारक करण्यात आल्याच्या निर्णयावरून विधानसभेत आज मोठा गदारोळ पाहायला मिळाला. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी "स्मार्ट मीटर बंधनकारक असून प्रीपेड मीटर ऐच्छिक आहे," असे स्पष्टीकरण देताच विरोधी बाकांवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "ही जनतेची लूट करणारे खोटे बोलणारे सरकार आहे," असा घणाघात पटोले यांनी केला. विशेष म्हणजे, सत्ताधारी गटाचे आमदार नितेश राणे यांनीही ग्रामीण भागात स्मार्ट मीटरवरून प्रचंड असंतोष असून, "अधिकारी कधीही मार खातील," असा इशारा देत घरचा आहेर दिला. सोलापूरचे आमदार देवेंद्र कोठे आणि भीमराव तापकीर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर विधानसभेत ही चर्चा झाली.

राज्यात विविध विद्युत कायद्यानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांसाठी 'स्मार्ट मीटर' बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, 'प्रीपेड स्मार्ट मीटर' स्वीकारणे ग्राहकांसाठी ऐच्छिक राहील. राज्यात आतापर्यंत 1 कोटी 23 लाख ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. त्यापैकी 3 लाख 92 हजार ग्राहकांच्या वीजबिलांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून, अधिकारी प्रत्यक्ष भेट देऊन त्याचे निराकरण करत आहेत. बिलवाढीच्या अनेक तक्रारी चुकीच्या असल्याचा दावाही राज्यमंत्र्यांनी केला.

राज्यमंत्र्यांच्या या उत्तरावर नाना पटोले प्रचंड आक्रमक झाले. त्यांनी सभागृहात आणि माध्यमांसमोर सरकारला धारेवर धरत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, "स्मार्ट मीटर बसवण्याचे कंत्राट नेमक्या कोणत्या मोठ्या कंपनीला दिले आहे, त्याचे नाव सरकार का लपवत आहे? महावितरणचे अधिकारी किंवा लाईनमन न पाठवता, कंत्राटदाराची खाजगी माणसे लोकांच्या घरात घुसून जबरदस्तीने जुने चांगले मीटर काढून स्मार्ट मीटर लावत आहेत. नवीन स्मार्ट मीटर इतक्या वेगाने फिरतात की, ग्राहकांना पूर्वीपेक्षा तीन ते चार पट अधिक वीज बिल येत आहे. आधीच महागाईने होरपळणाऱ्या जनतेचे आर्थिक नियोजन या 'स्मार्ट मीटर'ने कोलमडले असून, ही थेट जनतेची लूट आहे."

मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी सभागृहात 'स्मार्ट मीटर योजना ऐच्छिक राहील' असे सांगितले होते. मग आता ती सक्तीची का केली जात आहे? सभागृहात खोटे बोलण्यापेक्षा आणखी वाईट काय असू शकते? उत्तर प्रदेशसारख्या राज्यांत लोक वीज चोरी करतात, पण महाराष्ट्रातील जनता प्रामाणिकपणे वीज बिल भरते. मग महाराष्ट्रातील जनतेवर सरकारचा विश्वास उरला नाही का? त्यांना चोर समजून ही व्यवस्था आणली का? जबरदस्तीने लावलेले सर्व स्मार्ट मीटर त्वरित काढून पुन्हा जुने रेग्युलर मीटर लावावेत, अशी थेट मागणी पटोले यांनी केली. तसेच, यामागे नेमका कोणाचा दबाव आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

केवळ विरोधकच नव्हे, तर सत्ताधारी पक्षाचे आमदार नितेश राणे यांनीही ग्रामीण भागातील भीषण वास्तव सभागृहात मांडले. ते म्हणाले, "ग्रामीण भागात स्मार्ट मीटरवरून प्रचंड असंतोष आहे. अधिकारी दुरुस्तीच्या नावाखाली जातात आणि ग्राहकाची परवानगी न घेता थेट स्मार्ट मीटर लावून टाकतात. ग्रामीण भागात नुसती गाडी जरी नेली तरी लोक रस्त्यावर उतरून तक्रारी करत आहेत. ही परिस्थिती अशीच राहिली तर अधिकारी कधीतरी मार खातील," असा थेट इशारा राणे यांनी दिला.

# पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावर मुख्यमंत्र्यांची निर्णायक बैठक

*१५ वर्षांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम मिळणार : अण्णा बनसोडे-विधानसभा उपाध्यक्ष*

मुंबई (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणाऱ्या महत्त्वाकांक्षी पवना धरण–निगडी जलशुद्धीकरण केंद्र थेट जलवाहिनी प्रकल्पाला गती मिळाली असून, प्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारने निर्णायक पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन, मुंबई येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत प्रकल्पातील प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीनंतर विधानसभा उपाध्यक्ष तथा आमदार अण्णा बनसोडे यांनी सांगितले की, प्रकल्पासंदर्भात शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक असून, पुढील आठवड्यात शेतकरी व विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत सर्व संबंधितांची मते जाणून घेतल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. त्यामुळे प्रकल्पातील सर्व अडथळे दूर करून तो लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर समन्वयाने कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार श्रीरंग बारणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार शंकर जगताप, आमदार सुनील शेळके, माजी आमदार बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवडचे महापौर, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यासह पुणे विभागीय आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता तसेच नगरविकास, जलसंपदा, महसूल, रेल्वे, एमएसआरडीसी, महावितरण, पीएमआरडीए आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पवना–निगडी थेट जलवाहिनी प्रकल्पाला नव्याने गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, पिंपरी-चिंचवडकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली आहे.

# संपादकीय

## नागपूरच्या विकासाला नवे पंख

**नागपूरच्या १०९ वर्षांच्या ऐतिहासिक विमानतळाच्या विकासाला आता नवे पंख लाभणार आहेत. 'जीएमआर एअरपोर्ट्स'कडे विस्तारीकरणाची जबाबदारी सोपविल्याने २०२९ पर्यंत ते देशातील महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक आणि कार्गो हब म्हणून उदयास येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तारीकरण कार्यक्रम हाती घेण्यासाठी विमानतळ जीएमआर एअरपोर्ट्स या हवाई व्यवसायातील पायाभूत सुविधा उभारणाऱ्या कंपनीकडे सोपवण्यात आले आहे. त्यामुळे पुढील तीन वर्षांत हे विमानतळ आंतरराष्ट्रीय हवाई वाहतुकीचे एक केंद्र बनल्याशिवाय राहणार नाही. नुकत्याच झालेल्या एका समारोहात हे विमानतळ समूहाकडे हस्तांतरित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,(Devandra fadnavis)) केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू, जीएमआर एअरपोर्ट्सचे अध्यक्ष जी. बी. एस. राजू, खा. प्रफुल्ल पटेल, खा. माया इवनाते, नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूरचे विमानतळ जवळजवळ १०९ वर्षे जुने विमानतळ आहे. मिळालेल्या माहितीनुसार १९१७-१८ मध्ये तत्कालीन इंग्रज सरकारने लष्करी वाहतुकीसाठी रॉयल डिफेन्स सर्विस नावाची सेवा सुरू केली होती. त्यासाठी नागपूरजवळ असलेल्या सोनेगाव परिसरात हे विमानतळ उभारण्यात आले होते. सुरुवातीला या विमानतळाचा उपयोग फक्त लष्करी कामासाठीच केला जात होता. त्यावेळी नागपूर जवळच असलेल्या कामठीमध्ये लष्कराचा एक तळ होता. त्यासाठी हे विमानतळ वापरले जात होते. १९५३ पासून मात्र नागरी विमान वाहतूक या विमानतळावरून सुरू झाली होती. नागपूर हे देशाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात पोस्टाची डाक वाहून नेणारी विमाने नागपूरला थांबत असत आणि इथे बाकीची देवाणघेवाण केली जात असे. त्यामुळे त्या काळात नागपूर विमानतळावर सर्व विमाने मध्यरात्रीच यायची. १९६९ मध्ये नागपुरात नागपूर विरुद्ध न्यूझीलंड यांचा कसोटी क्रिकेट सामना झाला होता. त्यावेळी दोन्ही कसोटी संघाचे खेळाडू मध्यरात्रीच नागपूरच्या विमानतळावर उतरले होते. १९६३ मध्ये नागपूरला हवाई दलाचे एअर फोर्स मेंटेनन्स कमांड सुरू झाले. त्यामुळे नागपूरच्या सोनेगाव विमानतळाचे महत्त्व अधिकच वाढले.

त्याच काळात नागपूरजवळ भंडारा येथे ऑर्डनन्स फॅक्टरी सुरू झाली होती, तर वर्धा जिल्ह्यात पुलगाव येथे स्फोटकांचा डेपोही उभारण्यात आला होता. या सर्वच प्रकल्पांसाठी नागपूर विमानतळाचा उपयोग होऊ लागला होता. हळूहळू प्रवासी आणि मालवाहतूकही वाढू लागली. दिवसाला एक विमान मुंबईचे तर एक विमान दिल्लीचे असे जाऊ लागले. याशिवाय मान्यवरांची विशेष विमाने इथेच उतरवली जाऊ लागली. असे असले तरी नागपूरचे विमानतळ हे या काळात अगदी छोट्याशा इमारतीत बसलेले होते.

मात्र १९९० नंतर विमानतळाचे विस्तारीकरण सुरू झाले. विमानतळ मोठ्या इमारतीत गेले. नागपुरातून मुंबई आणि दिल्लीसह इतरही मोठ्या शहरांमध्ये विमान वाहतूक सुरू झाली. २००२ मध्ये नागपूरला आंतरराष्ट्रीय कार्गो हब सुरू करण्याचा निर्णय झाला. तिथून विमानतळाच्या विस्तारीकरणाला अधिकच वेग आला. २००५ मध्ये नागपूरहून दुबई आणि शारजा येथे आंतरराष्ट्रीय फेऱ्यासुद्धा सुरू झाल्या. हळूहळू नागपूरचे महत्त्व वाढत होते. २००८ मध्ये या विमानतळाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यात आले.

आज या विमानतळावरून दिवसाला जवळजवळ ३५ ते ४० विमानांचे उड्डाण होत असते आणि त्याचबरोबर लँडिंग देखील होते. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी ही परिस्थिती बदलायची ठरवली. त्यांनी कार्गो हबच्या पूर्ततेसाठी प्रयत्न सुरू केले आणि त्याचबरोबर ही सर्व विमाने इथे थांबून जर पुढे गेली तर विदर्भाच्या अर्थकारणाला नवी चालना मिळेल असा विचार त्यांनी केला आणि त्यादृष्टीने पावलेही उचलली. अर्थात त्यात अडथळे देखील प्रचंड आले.

## संस्कृत सुभाषित

सर्वे क्षयान्ता निचया: पतनान्ता : समुच्छ्रया:।
संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तंच जीवितम्।।

अर्थ – सर्व प्रकारच्या संग्रहाचा शेवट हा त्यांच्या नाशात होतो, तसेच मलिनाचा शेवटही वियोगात आणि जीवनाचा शेवट मरणात होतो.

## गुरु वचन

### देश आणि काळाचे ज्ञान

देश आणि काळाच्या संबंधात जे आपले ज्ञान आहे. ते खूपच मर्यादित आणि थोडे आहे. आपण देशाच्या खोलवर जात नाही त्याचे मूळ समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. वेळ किंवा काळ काय आहे. त्याचे मूळ स्वरुप काय आहे. याला खरोखरच मनात उतरवल्याने देश आणि काळाचे आपले अपूर्ण ज्ञान काही अंशी पूर्ण होऊ शकते आणि आपले विचार सीमित देश आणि परिमित काळाच्या मागे जाऊ शकतात. विचार करण्याची गोष्ट ही आहे की, आपण युग, वर्ष, महिना, दिवस आदींना काळ समजतो तो काळ हा प्रकृतीपासून निर्मित आहे. आणि प्रकृतीच्या गर्भात आहे. परंतु महाप्रलयाच्या वेळी जेव्हा हे कार्यरुप संपूर्ण जगात आपल्या कार्यरुप प्रकृतीमध्ये मिळून जाते. त्यावेळी देश–काळाचे रुप काय असते. ते देशकाळ प्रकृतीचे कार्य असते. त्यामुळे या प्रश्नावर विचार केला तर असे वाटते की, अशक्त देश काळ ज्या अशक्त देश काह ज्या प्रकृतीरुप देश काळात मिळून जातात. प्रकृती रुप देश काळतर प्रकृतीचे स्वरुप आहे. आणि या प्रकृतीचे जे अधिष्ठान आहे. अर्थात ही प्रकृती आपले कार्य संपूर्ण जड दृश्यवर्ग मिळाल्यानंतरच ज्यामध्ये ही स्थिती असते. ते अधिष्ठान प्रकृतीचे कार्य असू शकत नाही. ते तर सर्वांचे पहिले कारण आहे आणि सर्वांचे पहिले कारण एकमात्र विज्ञानान्धन परमात्मा हेच आहे. त्या विज्ञानन्दन ती साम्यावस्थामध्ये राहते आणि कधी विकासाला प्राप्त होते. ज्यावेळी ती साम्यावस्थमध्ये त्यावेळी आपले कार्य समस्त जड दृश्यवर्गाला आपल्यात लीन करुन परमात्माच्या कोणत्याही एक अंशी स्थिती असते. आणि ज्यावेळी तोच परमात्माला सकारात्मकतेमुळे विषमता प्राप्त होते. त्यावेळी परमात्म्याची देखरेख संसाराचे सृजनत्व असते.

## उपदेशकथा

### रुग्णसेवा

स्वामी विवेकानंद पाश्चात्य देशांचा प्रवास करून परत आले आणि त्यानंतर त्यांची प्रकृती खूपच खालावली. डॉक्टरांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला म्हणून ते दार्जिलिंगला गेले. तेथे असतानाच त्यांना बातमी समजली की, कलकत्यात प्लेगने हाहाकार माजवला आहे. हजारो लोक मृत्युमुखी पडले आहेत. आपण अशावेळी विश्रांती घेत बसणे पूर्णपणे चूक आहे असे स्वामीजींना वाटले. प्लेगच्या रुग्णांची सेवा करताना प्राण गेला तरी चालेल पण आपण ही रुग्णसेवा केलीच पाहिजे, असे ठरवून ते कलकत्यास परत आले. तेथे आल्यावर त्यांनी एक पत्रक काढून सर्वत्र वाटले. त्यात म्हटले होते की, ज्यांना कोणाला कोणत्याही प्रकारची मदत हवी असेल, त्यांना ती रामकृष्ण संघाकडून मिळेल. त्यांनी सेवापथके स्थापन केली आणि रुग्णांची शुश्रूषा करण्याचे काम त्यांच्यावर सोपवले.

कथा उपदेश : जो आपले स्वत:चे दु:ख विसरून

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | योग:प्रीति १७:०१:०० |
| ४ जुलै २०२६ | करण:बालव १२:४०:१४ |
| शनिवार | करण:कौलव |
| विक्रम संवत्– २०८२ | २५:०९:३६+ |
| निज ज्येष्ठ शके | सूर्य:मिथुन |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कुम्भ००:४८:०७ |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – मोहरम |
| मास– निज ज्येष्ठ | तारीख – १८ |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| कृष्ण पक्ष | यादवराव महाराज |
| तिथि:चतुर्थी १२:४०:१४ | पुण्यतिथी – धापेवाडा |
| नक्षत्र:धनिष्ठा १३:४३:३२ | (नागपूर) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०००

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| 1 | 9 | 8 | | | 7 | 4 | 6 | 3 |
| | | 3 | | | 6 | 7 | 9 | |
| | 3 | 7 | | | 1 | 8 | | 4 |
| | 8 | | 4 | | 5 | | 7 | |
| 5 | | 6 | 7 | | | 2 | 3 | |
| | 6 | 5 | 8 | | | 9 | | |
| 8 | 1 | 4 | 6 | | | 3 | 2 | 5 |
| | | | | | | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 5 | 2 | 6 | 3 | 8 | 4 | 7 | 1 |
| 1 | 3 | 8 | 7 | 4 | 2 | 9 | 6 | 5 |
| 7 | 4 | 6 | 1 | 9 | 5 | 3 | 8 | 2 |
| 3 | 1 | 4 | 5 | 7 | 6 | 8 | 2 | 9 |
| 5 | 2 | 7 | 9 | 8 | 4 | 6 | 1 | 3 |
| 6 | 8 | 9 | 3 | 2 | 1 | 7 | 5 | 4 |
| 8 | 6 | 5 | 4 | 1 | 3 | 2 | 9 | 7 |
| 2 | 7 | 3 | 8 | 5 | 9 | 1 | 4 | 6 |
| 4 | 9 | 1 | 2 | 6 | 7 | 5 | 3 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८८७ – कायदे आजम मोहम्मद अली जिना सिंध मदरसतुल इस्लामशी जुडले.
- १९५४ – स्वीटझरलंड येथे जर्मनीने हंगरीला हरवून फीफा विश्वचषक जिंकले.
- १९९७ – नासाचा पाथफैंडर मंगळवर पोहचला.
- २००८ – अमेरिकेतल्या ३४ वर्षीय पुरुष थॉमस बेटीने मुलीला जन्म दिला.

### राष्ट्रीय

- १९४७ – भारताचा स्वतंत्रताचा बिल ब्रिटीश कॉमन हाऊसमध्ये सादर.
- १९४७ – ब्रिटीश भारताचा दोन स्वतंत्र देश भारत–पाकिस्तानमध्ये विभाजनचा निर्णय.
- २००६ – हिमाचल प्रदेशातील किन्नोर जिल्ह्यातील मेलिंगमध्ये दरड कोसळून ११ जण ठार झाले.
- २००६ – झारखंडच्या गढवा जिल्ह्यातील धुरकी ठाणे हद्दीतील कनहर नदीत बालचौरा घाटाजवळ एक नाव उलटून ९ जण ठार झाले.

### जन्म

- १५४६ – ओट्टोमनचा सुल्तान मुरात तिसरा याचा जन्म.
- १८८३ – अमेरिकन व्यांगचित्रकार रुबे गोल्डबर्ग याचा जन्म.
- १९३७ – नार्वेची राणी सोनजा हेराल्डसन हिचा जन्म.

### निधन

- ०९६५ – पोप बेनीडेक्ट पाचवा यांचे निधन.
- १९६३ – न्यूझीलंडचे गर्व्हनर–जर्नल बरनार्ड यांचे निधन.
- २००५ – अमेरिकन फुटबॉल प्रशिक्षक हंक स्ट्रेन यांचे निधन.
- २००७ – शाहीर स्राट बापूराव विरुपाक्ष विभुते यांचे निधन.

## : SMS :

*Ek Chohay Ne 1*
*Poora Suit Kutar*
*k Kha Lia.*
*Magar Woh Phir bhi*
*Bhok se Mar Gaya,*
*Kyon?*
*Q k*
*Woh Suit*
*Malika Sharwat*
*ka Tha.*

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.५ | २४.४ |
| अहमदनगर | २६.९ | २२.८ |
| अकोला | ३४.७ | २४.६ |
| अमरावती | ३३.१ | २५ |
| बीड | ३४ | २५.२ |
| भंडारा | ३४.३ | २६.३ |
| बुलढाणा | ४० | २९.९ |
| चंद्रपूर | ३२.६ | २५.६ |
| चेन्नई | ३९.८ | २९.७ |
| नवी दिल्ली | ४१.२ | ३२.२ |
| धुळे | ३७.१ | २६.१ |
| गोंदिया | ३३.५ | २६.६ |
| जळगाव | ३४.९ | २४.७ |
| कोल्हापूर | २७ | २३.२ |
| लातूर | ३१.५ | २३.४ |
| मुंबई | ३३.९ | ३०.६ |
| नागपूर | ३५.१ | २४.६ |
| नांदेड | ३१.७ | २४.२ |
| नंदूरबार | ३३.४ | २५.६ |
| नाशिक | २६.५ | २२.१ |
| पुणे | २४ | २३ |
| पंढरपूर | ३२.७ | २४.७ |
| सातारा | २९.३ | २१.३ |
| सांगली | ३१.२ | २३.८ |
| सोलापूर | ३३.२ | २५.१ |
| वर्धा | ३४.१ | २५.३ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल. सकारात्मक विचारांमुळे अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील.

**तूळ :** धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजकार्यासाठी तसेच धार्मिक कार्यासाठी निधी उभा करण्यात आपला पुढाकार राहील.

**वृषभ :** घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता महिला नवीन खरेदीचे मनसुबे आखतील. सतत पाहुण्यांची वर्दळ राहील.

**वृश्चिक :** राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांना समाजात नावलौकिक मिळेल. कामाच्या व्यापात आपल्या प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करु नका.

**मिथून :** संततीच्या उत्कर्षाची वार्ता कानी येईल. हितशत्रूंच्या कारवायांवर मोठया युक्तीवादाने मात करता येईल. शेवटी विजय आपलाच होईल.

**धनू :** कोणत्याही मोहाला बळी पडू नका. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. राजकीय कार्यकर्त्यांना काही अडचणींना सामोरे जावे लागेल.

**कर्क :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. जनसंपर्कातून लाभ होतील. आपल्या इच्छा, अपेक्षा स्वत:च्या काबूत ठेवाव्यात.

**मकर :** नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना चांगल्या संधी लाभतील. तरुणांच्या कौशल्याला चांगला वाव मिळेल.


**सिंह :** उधारी उसनवारी टाळावी. मोठे आर्थिक व्यवहार तूर्त टाळावेत. कामानिमित्त प्रवास घडतील. अपेक्षित पत्रव्यवहार होतील. भावंडांशी सुसंवाद साधाल.

**कुंभ :** राहत्या जागेचे किंवा व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील. महिला स्वत:च्या पद्धतीने गृह सजावट करतील. महिलांना बदलाची नितांत गरज भासेल.

**कन्या :** जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल.

**मीन :** यशस्वी होण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. स्वत:चे प्रयत्न स्वत:च करावेत. नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०००



### आडवे शब्द

१. दडपण, वजन
३. आकाशाला भेदणारा आवाज इत्यादी
८. गंध
१०. भ्रम
१२. बर्फाचा पर्वत
१४. गरजू
१६. रानात जाणारा रस्ता
१८. वाकबगार, निपुण
२०. साप
२१. गाढव
२२. जिवंत
२४. घरातील मोठी माणसे
२६. मोठी बहीण
२७. शेंगेवरील आवरण, फोलपट
२९. खुंटी, मेख
३०. पंख
३२. उत्तराधिकारी
३३. जन्म–मृत्यू
३५. फोडातील द्रव
३७. मधली बहीण
३८. रुचीहीन, बेचव
४०. उथळ मोठी वाटी
४१. राजवाडा
४२. प्रत्युत्तर
४३. इक्षुदंड, यापासून साखर बनवितात
४४. शूर
४५. खण पण कापड नव्हे
४६. श्रेष्ठ पुरुष
४९. कजाग स्त्री, आदिमाया
५१. सोन्याचे शिवकालीन नाणे
५३. हात
५५. तिरळा, काणा
५६अ. सत्त्व
५७. प्रताप, विक्रम
५९. प्रेत
६१. कलावंत
६३. मोठी जाड सतरंजी
६४. झाड
६५. चटकन रागावणारा
६६. काळ्या पाठीचे हरिण
६९. मुंबईतील एक उपनगर
७२. व्यवस्था, उद्योग
७३. समानता
७४. पेन–पन्सिलीची पेटी
७७. परिस्थिती
७८. झाडाची त्वचा
७९. पुरणाची आमटी, कोल्हापुरी मिसळीतील रस्सा
८०. पाटलाचे काम

### उभे शब्द

२. पूर्ण बहिरा
३. चुकीचे (हिंदी)
४. क्षमा, दुर्लक्ष
५. चीर, फट
६. नवऱ्याचा भाऊ
७. मित्र, सोबती
९. एकूणात प्रमाण
१०. किंमत
११. पाचवीला पुजली जाणारी
१३. कापड विणण्याचे साधन
१५. पशू
१७. आकाश
१९. मूळ आधार
२१. कृष्णसखी
२२. मिठाई तयार करणारा
२३. तपासणी करणारा
२५. बारीकसारीक
२६. तारणारा
२८. काढलेली सुट्टी
३०. अत्युच्च लष्करी बहुमान
३१. पांढरे केस लपवणारा
३४. अभिनेता
३६. खुंट, आंचळ
३७. संमोहित करणारे सौंदर्य
३९. मदतनीस
४७. मोजकेपणा, मितता
४८. सरस्वतीच्या जवळील वाद्य
४९. भ्रमर, भुंगा
५०. माणुसकी
५२. नकला करणारा
५४. धपाटा
५६. न्यूनता
५६ब. प्रभात
५८. सज्जनगडचे संत
६०. मऊ पदार्थाचा आघात
६२. दही घुसळण्याचे साधन
६६. फळावरील साल
६८. रायगडावरील एक कडा
७०. धमकी
७१. पवित्र, शुद्ध
७४. मनाचा ओढा
७५. घट्ट, धन
७६. शिल्लक राहिलेली रक्कम

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९९९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.समाचार घेणे ५.अज ७.पावसाळा १०.धड ११.चर १२.हितोपदेश १३.सम १४.मैना १५.सामना १६.जनगणना १८.कात्री १९.भू २०.तमासगीर २३.खास २५.जमा २७.ततपप २९.नावडतीचे मीठ अळणी ३३.रसा ३५.तन ३६.ळण ३८.राजवट ३९.नादावणे ४१.परवा ४३.अमर ४५.रन ४६.नकुल सहदेव ४९.मध ५०.जन्म ५१.रास ५३.वडा ५४.वळ ५५.हारजीत ५७.काजवा ५८.श्रावण ५९.वपन ६१.लव ६५.टरकणे ६७.हारा ६९.साखर ७१.कळक ७३.माळ ७४.जनगणमन ७६.समई ७८.पापा ७९.रसरशीत ८२.समरस ८३.मदन ८४.परीक्षा

उभे उत्तर : १.सधन २.माड ३.रचना ४.घेर ५.अतोनात ६.जप ७.पाश ८.सामान ९.सामनावीर १२.हिम १३.सण १४.मैत्री १६.जरतर १७.गडप १८.कासव २१. मावळण २२.गीत २३.खानावळ २४.युती २५.जमीनदार २६.माठ २८.पसारा ३०.डमडम ३१.चेतना ३२.अळणे ३४.नवरदेव ३७.बारकुडा ४०.वनराज ४१.पनवती ४२.वाल ४३.अधर ४४.रजतपट ४७.सजावट ४८.वळणदार ४९.महान ५२.सवाल ५६.जीव ६०.नरमाई ६२.वर्तन ६३.वहाण ६४.घळ ६६.कळ ६८.रामरक्षा ७०.खलाशी ७१.कळस ७२.कसर ७४.जपान ७५.नस ७७.मस ७८.पाद ८०.रस्सी ८१.तळे

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026' विषयावर मुलाखत

पुणे (दैनिक संध्या) : राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' या विषयावर आधारित विशेष मुलाखतीचे प्रसारण शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.१० ते १०.२५ या वेळेत आकाशवाणी पुणे 'अ' केंद्रावर होणार आहे. या विशेष मुलाखतीत सहकारी संस्था पुणे ग्रामीणचे जिल्हा उपनिबंधक प्रकाश लक्ष्मण जगताप हे योजनेची उद्दिष्टे, पात्रता, लाभार्थी निवडीची प्रक्रिया, कर्जमाफीच्या अंमलबजावणीचे विविध टप्पे तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या लाभांविषयी सविस्तर माहिती देणार आहेत. मुलाखतीचे सूत्रसंचालन व प्रश्नोत्तरांचे संचालन जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटीलयांनी केले आहे. संवादात्मक स्वरूपातील या कार्यक्रमातून शेतकरी, सहकारी संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील विविध शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकरी बांधवांनी या योजनेची अधिकृत, अचूक आणि विश्वासार्ह माहिती जाणून घेण्यासाठी शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.१० वाजता ते १०.२५ वाजता या वेळेत आकाशवाणी पुणे 'अ' केंद्रावरील हा विशेष कार्यक्रम आवर्जून ऐकावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत अर्ज करण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : सन २०२६-२७ साठी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पीक विमा योजनेत मृग व आंबिया बहार हंगामासाठी संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरु, लिंबू, सिताफळ, द्राक्ष तसेच हळद व अंजीर या फळपिकांचा समावेश असून योजनेच्या लाभासाठी १४ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजूरकर यांनी केले आहे. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. योजनेत प्रती शेतकरी सहभागासाठी कमीत कमी उत्पादनक्षेत्र २० गुंठे व कमाल ४ हेक्टर क्षेत्रासाठी विमा संरक्षण लागू राहणार आहे. शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी, डिजीटल पीक संरक्षण नोंद, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणा उतारा, फळबागेचा जिओ टॅगिंग फोटो व भाडेपट्टीने शेती करणाऱ्यास नोंदणीकृत भाडेकरार इत्यादी कागदपत्र बंधनकारक आहे.कर्जदार शेतकऱ्यांसाठी योजनेत सहभागी होण्याबाबत घोषणापत्र अंतिम मुदतीच्या ७ दिवस अगोदर बँकेला देणे आवश्यक आहे. एका तालुक्यात ५०० पेक्षा जास्त विमा अर्ज असल्यास, त्या ठिकाणी विमा कंपनी रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाने फळबागेची क्षेत्र पडताळणी करेल आणि ५०० पेक्षा कमी विमा अर्ज असल्यास, त्या ठिकाणी विमा कंपनी कृषी विभागाच्या सहकार्याने प्रत्यक्ष फळबाग लागवड क्षेत्र पडताळणी करेल. पुणे विभागातील पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यात भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड, मुंबई क्षेत्रिय कार्यालय, स्टॉक एक्स्चेंज टॉवर्स, विसावा मजला, दलाल स्ट्रिट, फोर्ट, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी नजिकचे कृषी कार्यालय अथवा विमा कंपनी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही श्री. जेजूरकर यांनी कळविले आहे.

### कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेसाठी विशेष अंमलबजावणी मोहीम

■ पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा

पुणे (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत १९ जून ते २० जुलै २०२६ या कालावधीत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना बँकांकडून मंजूर होणाऱ्या रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, कस्टम हायरिंग सेंटर आदी कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी या योजनेचा लाभ घेता येतो. वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट तसेच इतर पात्र संस्था या योजनेसाठी पात्र आहेत. विशेष मोहिमेदरम्यान जनजागृती, शेतकरी मेळावे, कार्यशाळा व मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांनी तालुका कृषी अधिकारी, आत्मा, कृषी विभाग किंवा जवळच्या राष्ट्रीयीकृत, अनुसूचित बँकेशी संपर्क साधून तसेच https://agriinfra.dac.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषि संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी केले आहे.

### 'प्राचीन शास्त्रे किती खरी' यावर शनिवारी रंगणार वादसभा





■ पांडुरंग बलकवडे, आशुतोष बापट यांना पुरस्कार

■ प्रसाद प्रकाशनतर्फे ४ जुलै रोजी वादसभा, पुरस्कार वितरण व ग्रंथ प्रकाशन

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय परंपरेत प्राचीन काळापासून विविध विषयांवर शास्त्रार्थ आणि वादसंवादाची समृद्ध परंपरा राहिली आहे. ज्ञानाची चिकित्सा, विविध मतप्रवाहांचा अभ्यास आणि सत्याचा शोध या उद्देशाने आयोजित केल्या जाणाऱ्या अशा वादसभांनी भारतीय वैचारिक परंपरा अधिक समृद्ध केली. याच परंपरेचा जागर करत प्रसाद प्रकाशन आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता एस. एम. जोशी सभागृह, गांजेवे चौक, पुणे येथे पुरस्कार विशेष वादसभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पुरस्कार वितरण, ग्रंथ प्रकाशन देखील होणार आहे अशी माहिती प्रसाद प्रकाशनच्या संचालिका डॉ. उमा बोडस यांनी दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ प्रा. प्र. के. घाणेकर हे असणार आहेत. माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विचारक राजेश पांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ पांडुरंग बलकवडे आणि भारतीय विद्या तज्ज्ञ आशुतोष बापट यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या वादसभेचा विषय 'प्राचीन शास्त्रे किती खरी' असा आहे. या वादसभेच्या न्यायाध्यक्षपदी डॉ. नितीन करमळकर असतील. वादसभेत डॉ. माधवी गोडबोले, डॉ. मनीषा पुराणिक, डॉ. मनीष वाळवेकर, डॉ. अंबरीष खरे, श्री. रमेश दाते आणि डॉ. दीप्ती सिधये हे सहभागी होऊन विषयाच्या विविध पैलूंवर आपली मते मांडणार आहेत. याशिवाय प्रसाद प्रकाशन आणि अनाहत प्रकाशन यांच्या विविध पुस्तकांचे प्रकाशनही या कार्यक्रमात होणार आहे. प्रलय कथा, प्राचीन भारतीय भौतिकशास्त्र, भारताचे राजवैभव, देव जसा आहे आहे तसा का आहे, कुंभमेळा, नाती, आनंदाची मोळी यांसह विविध ग्रंथांचे प्रकाशन या वेळी करण्यात येणार आहे.

## गोसेवा व गोसंवर्धनासाठी कार्यरत गोशाळांना आर्थिक मदत

पुणे (दै. संध्या)



ग्रंथ पारायण दिंडी आणि गीताधर्म मंडळ यांच्या वतीने गोसेवा आणि गोसंवर्धनाचे कार्य निष्ठेने करणाऱ्या गोशाळा संचालकांचा सन्मान करत विविध गोशाळांना आर्थिक मदत व देणग्या देण्यात आल्या. सदाशिव पेठेतील गीता धर्म मंडळात प्रथमच मराठीत आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय गो कथा महोत्सवात ही मदत देण्यात आली. या गो कथेचे निरूपण ह.भ.प. परेश बुवा देवळणकर यांनी केले.

परेश बुवा देवळणकर म्हणाले, दुभती असताना गायीची सेवा अनेकदा दुधाच्या अपेक्षेने केली जाते. मात्र, भाकड गाईची सेवा करताना कोणताही आर्थिक लाभ मनात नसतो. त्यामुळे अशा निस्वार्थी सेवेचे पुण्य प्राप्त होते. भाकड गायीची सेवा केल्याने गोमातेबद्दलचा कृतज्ञतेचा भाव अधिक दृढ होतो.

ते पुढे म्हणाले, गोशाळेत जाऊन प्रत्यक्ष सेवा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भाकड गाईला कत्तलखान्यात जाण्यापासून वाचविणे हे अत्यंत पुण्याचे कार्य मानले गेले असून, अशा सेवेचे फळ एका अश्वमेध यज्ञाइतके असल्याचे शास्त्रात सांगितले आहे. महोत्सवात गोशाळांचे व्यवस्थापन व गो सेवेचे कार्य निष्ठेने चालविणाऱ्या गोशाळा संचालकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये स्वामी कृष्ण गोशाळा, खानापूर; गोमई गोशाळा, साधना आश्रम, गिवशी; मधुकर घुले यांची गोशाळा, कुळे (पौड-कोळवण रस्ता); पुनम राऊत यांची गोशाळा, पारगाव-खंडाळा तसेच धनकवडी लिमये यांची गोशाळा यांचा समावेश होता. आयोजक वीरेंद्र कुंटे म्हणाले, भारतीय संस्कृतीत गोमातेला अत्यंत पूजनीय स्थान आहे. गोसेवा, गोसंवर्धन आणि गोदान या विषयांबाबत समाजात जनजागृती व्हावी, तसेच भाविकांमध्ये गोभक्तीची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने प्रथमच मराठीत गोकथेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# स्मार्ट सिटीचा बोजवारा!

## पावसात तुंबले रस्ते, खड्डे आणि वाहतूक कोंडीने पुणेकर हैराण

पुणे (दै. संध्या)

स्मार्ट सिटीचा आव आणणाऱ्या महापालिकेच्या मान्सूनपूर्व कामांची संततधार पावसाने पुरती पोलखोल केली. शहरातील तुंबलेल्या सांडपाणी वाहिन्या आणि रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे पुणेकरांना वाहतूक कोंडीला समोरे जावे लागले. महापालिका आणि वाहतूक प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे शुक्रवारी ऐन गर्दीच्या वेळी मुख्य रस्त्यांवर वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. यामुळे नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

मध्यवर्ती पुण्यासह उपनगरांना जोडणारे जवळपास प्रमुख रस्ते आज ठप्प झाले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, बाजीराव रस्ता, शनिपार, काँग्रेस भवन ते घोले रस्ता, फर्ग्युसन रस्ता, सेनापती बापट रस्ता आणि लक्ष्मी रस्त्यावरील नगरकर तालीम चौकात वाहतूक कोंडी झाली होती. संकष्टी चतुर्थीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील वाहतूक वळविण्यात आली होती. तसेच, मेट्रोच्या कामासाठी भिडे पूल वाहतुकीसाठी सध्या बंद आहे. त्यामुळे पेठांमध्ये वाहतूक संथ गतीने सुरू होती. याशिवाय मंगळवार पेठ, पुणे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आणि लष्कर परिसरातील ईस्ट स्ट्रीट भागात वाहतुकीचा बोजवारा उडाला. शहरातील मलनिःसारण वाहिन्या तुंबल्यामुळे शाहीर अमर शेख चौक, सेव्हन लव्हज चौक आणि ताडीगुत्ता चौकात रस्त्यांवर पाणी साचले होते. बाणेरमधील राधा हॉटेल चौक आणि कोरेगाव पार्कमधील नॉर्थ मेन रस्ता परिसरातील सखल भागात पाणी साचल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती. हडपसर, धायरी, तसेच सोलापूर रस्त्याला जोडणाऱ्या वानवडी, फातिमानगर आणि भैरोबानाला चौक या पट्ट्यात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग कमालीचा मंदावला होता.



### सेवा रस्त्यावर वाहने अडकली

पुणे-बंगळूर महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांवर पाणी साचल्याने आणि पुनावळे येथील भुयारी मार्ग अरुंद असल्याने येथे वाहने एकाच जागेवर अडकून पडली होती. दुसरीकडे, जहाँगीर हॉस्पिटल चौक ते मंगलदास चौक दरम्यान मलनिःसारण वाहिनी फुटल्याने महापालिकेकडून दुरुस्तीचे काम सुरू होते. हा रस्ता वाहतुकीसाठी बंद केल्याने बंडगार्डन परिसरावर वाहतुकीचा ताण आला. खोदलेले रस्ते वेळेत न बुजवल्यामुळे तयार झालेले खड्डे वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरले.



## पुण्यातील मंदिरांना मिळणार नवी ओळख

पुणे (दै. संध्या)

■ 'नागरिक सोशल फाउंडेशन'तर्फे' आदर्श मंदिर स्पर्धा २०२६'चे आयोजन

पुणे हे विद्येचे माहेरघर असण्यासोबतच सांस्कृतिक वारसा आणि मंदिरांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. मंदिरांमधील संस्कृती जपणे, स्वच्छता, पर्यावरणपूरक उपक्रम आणि उत्तम व्यवस्थापनाद्वारे मंदिरांचा कायापालट करणे या उद्देशाने 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या 'भक्ती शक्ती' विभागामार्फत 'आदर्श मंदिर स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या वतीने सायली गोडबोले - जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी नागरिक सोशल फाउंडेशनचे संचालक अमेय सप्रे, सीए सर्वेश मेहेंदळे , चंद्रशेखर शिरुडे, पूजा भंडारे, सुधीर जोशी आदी उपस्थित होते.

मंदिरं ही केवळ धार्मिक स्थळं नसून ती समाजप्रबोधन आणि शिस्तीची केंद्रे आहेत. जुन्या आणि दुर्लक्षित मंदिरांना पुन्हा प्रकाशझोतात आणणे, मंदिरांविषयी समाजात आस्था निर्माण करणे आणि ही मंदिरे आपल्या सांस्कृतिक वैभवाचा पाया आहेत, हे अधोरेखित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. ही स्पर्धा १५ जुलै २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत पार पडणार आहे. स्पर्धा पूर्णतः विनामूल्य आहे. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंदिरांना रोख रक्कम आणि सन्मानचिन्हं देऊन गौरवण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम पारितोषिक: ३१,०००/- रुपये, द्वितीय पारितोषिक: २१,०००/- रुपये, तृतीय पारितोषिक: ११,०००/- रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक: ७,५००/- रुपये अशी पारितोषिकं असणार आहेत.

आपल्या संस्कृतीच्या जतनासाठी आणि मंदिरांच्या आधुनिक व्यवस्थापनासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त मंदिरांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवावा, असे आवाहन 'नागरिक सोशल फाउंडेशन'तर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आणि सहभागासाठी इच्छुक मंदिरांनी 9970154167/ 9822848287 या क्रमांकावर 'नागरिक सोशल फाउंडेशन'च्या 'भक्ती शक्ती' विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुण्यातील संशोधकांची मोठी कामगिरी!

पुणे (दै. संध्या)

■ तेलप्रदूषित पाणी स्वच्छ करण्याचे डीआयएटीचे तंत्रज्ञान; सूक्ष्म शैवालांद्वारे तेलप्रदूषणावर मात..

औद्योगिक अपघात, तेलवाहू जहाजांमधील दुर्घटना आणि जागतिक संघर्षांमुळे ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे पाण्यातील तेलगळती ही एक गंभीर पर्यावरणीय समस्या बनली आहे. नद्या, तलाव आणि सागरी जैवविविधतेला असलेला हा धोका रोखण्यासाठी पुण्यातील 'संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्थे'च्या (डीआयएटी) संशोधकांनी सूक्ष्म शैवालांच्या (मायक्रोअल्गी) साहाय्याने तेलाने प्रदूषित झालेले पाणी स्वच्छ करण्याचे पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित केले आहे. 'डीआयएटी'च्या धातुकर्म आणि पदार्थ अभियांत्रिकी विभागातील प्रा. के. बालसुब्रमणियन यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन करण्यात आले. तेलगळती स्वच्छ करण्यासाठी साधारणतः रसायने किंवा खूप ऊर्जा लागणाऱ्या पारंपरिक पद्धतींचा वापर केला जातो. मात्र, रासायनिक प्रक्रियांना शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून संशोधकांनी नैसर्गिक सूक्ष्म शैवालाचा आधार घेतला आहे. या नावीन्यपूर्ण संशोधनामध्ये सूक्ष्म शैवालांच्या नैसर्गिक क्षमतेचा वापर करण्यात आला असून, हे शैवाल पाण्यातील पेट्रोलियमजन्य प्रदूषके शोषून घेतात आणि हळूहळू त्यांचे नैसर्गिकरित्या विघटन करतात. यामुळे प्रदूषके नष्ट होऊन जलचरांसाठी अधिक पोषक वातावरण तयार होण्यास मदत होणार आहे.

## जय भवानी मित्र मंडळातर्फे ६४० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

पुणे (दै. संध्या)




■ मागील २५ वर्षांपासून सातत्याने उपक्रम; माजी उपमहापौर प्रसन्न जगताप यांची प्रमुख उपस्थिती

श्री वेताळ बाबा मंदिर ट्रस्ट, जय भवानी मित्र मंडळ, जय भवानी नगर, जनता वसाहत यांच्या वतीने परिसरातील गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्यावाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ६४० गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना वह्यांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, गेल्या २५ वर्षांपासून मंडळामार्फत हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. कार्यक्रमास पुण्याचे माजी उपमहापौर नगरसेवक प्रसन्न जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मित्रपरिवारातील कार्यकर्ते आकाश शेंडकर, रोहन बंगाल, हेमंत भाटी, अमोल हुंबरे, सोमनाथ सूर्यवंशी, आनंद भाटी, निवास गाडेकर, आकाश चव्हाण, नकुल बोंबले आदींनी परिश्रम घेतले. यावेळी माजी उपमहापौर नगरसेवक प्रसन्न जगताप म्हणाले, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जय भवानी मित्र मंडळ गेली अनेक वर्षे गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत असून, हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

## मनपा, नगरपालिका हद्दीतील वाढीव क्षेत्राला मिळणार 'प्रॉपर्टी कार्ड'

पुणे (दै. संध्या)

■ सरकारच्या निर्णयामुळे सर्वसामान्यांना दिलासा-डॉ. हुलगेश चलवादी

राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मा.रामदास आठवले साहेब आणि महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे साहेबांच्या नेतृत्वात महायुती सरकारकडून घेण्यात येणाऱ्या निर्णयांमुळे सर्वसामान्यांचे जीवन सुकर होतेय. मनपा, नगरपालिका हद्दीतील वाढीव क्षेत्राला 'प्रॉपर्टी कार्ड' मिळणार असल्याने मालमत्तेची खरेदी-विक्री, हस्तांतरण आणि बँकेकडून कर्ज घेणे अत्यंत सुलभ व पारदर्शक होईल, असा विश्वास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (ए) प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी शुक्रवारी (ता.३) व्यक्त केला.



महसूल व वन विभागाने घेतलेला नवीन शासन निर्णय हा राज्यातील सर्वसामान्य जनतेसाठी अत्यंत क्रांतीकारी आणि ऐतिहासिक ठरला आहे. महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या वाढीव हद्दीतील गावांमध्ये ७/१२ उतारे बंद करून त्याऐवजी 'मिळकतपत्रिका' (प्रॉपर्टी कार्ड) देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या महत्त्वपूर्ण व लोककल्याणकारी निर्णयाबद्दल डॉ.चलवादी यांनी महायुती सरकारचे जाहीर आभार मानले आहेत. शासकीय अधिकार्यांनी आता या निर्णयाचे तंतोतंत पालन करीत सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, असे आवाहन देखील त्यांनी केले.

शहरी भागात समाविष्ट झालेल्या अनेक गावांमध्ये अद्यापही ७/१२ चे अधिकार अभिलेख सुरू असल्यामुळे सर्वसामान्य मिळकत धारकांना आपल्या मालमत्तेचा स्पष्ट आणि निर्विवाद मालकी हक्क सिद्ध करण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. मात्र, आता ७/१२ बंद होऊन सिटी सर्व्हेद्वारे मिळकतपत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) उपलब्ध होणार असल्यामुळे मालमत्तेची खरेदी-विक्री, हस्तांतरण आणि बँकेकडून कर्ज घेणे अत्यंत सुलभ व पारदर्शक होईल, असे डॉ.चलवादी म्हणाले.

फडणवीस तसेच आठवले साहेबांच्या संवेदनशील आणि लोकाभिमुख नेतृत्वामुळेच हा प्रलंबित प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मार्गी लागला आहे.शासनाच्या या नवीन निर्णयामुळे भूमाफियांच्या त्रासापासून नागरिकांची मुक्तता होणार असून, सर्वसामान्यांचे गृहनिर्माण व मालमत्ता विषयक हक्क पूर्णपणे सुरक्षित होतील, असा ठाम विश्वास डॉ. चलवादी यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

ज्या शासकीय जमिनींवर अतिक्रमण झाले आहे, तिथे महसूल विभागाच्या नियमांनुसार जिल्हाधिकारी योग्य ती कायदेशीर कारवाई करून सर्वसामान्यांना त्यांच्या हक्काच्या मिळकतपत्रिका वितरित करतील. या संपूर्ण प्रक्रियेसाठी निधीची कमतरता भासू नये म्हणून जिल्हा वार्षिक निधी (डीपीसी) किंवा नगरोत्थान योजनेमधून तरतूद करण्यात आली आहे, ही बाब महत्वाची असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

## शेतकरी कर्जमुक्तीसाठी नैसर्गिक शेती अभियान ठरत आहे मैलाचा दगड

**राज्यशासन शेती आणि शेतकरी यांच्या हिताच्या अनेक योजना राबवित आहे. दुष्काळ, अनियमित पाऊस, गारपीट, अतिवृष्टी आदी नैसर्गिक आपत्तींमुळे आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासह त्यांना शेतीच्या कामांना नव्याने पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' नुकतीच जाहीर केली आहे. ही कर्जमुक्ती योजना दिलासादायक ठरत आहे. परंतु, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीसाठी पर्यावरणपूरक आणि कमी खर्चाच्या शेतीचा मार्ग अवलंबल्यास कर्जमुक्तीकडे टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल. त्या दृष्टीने 'राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान' उपयुक्त ठरत आहे.**

संकलन : विभागीय माहिती कार्यालय, पुणे

नैसर्गिक शेतीमध्ये स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या संसाधनांचा वापर करून जीवामृत, बीजामृत, आच्छादन, वाफसा आदी तंत्रांचा अवलंब केला जातो. त्यामुळे रासायनिक खते व कीटकनाशकांवरील खर्चात लक्षणीय बचत होऊन उत्पादन खर्च कमी करण्यास मदत होते. परिणामी शेती अधिक फायदेशीर बनत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास हातभार लागत आहे. कमी खर्चातील, पर्यावरणपूरक आणि शाश्वत शेती पद्धतीचा प्रसार करून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या अभियानाद्वारे केले जात आहे. पुणे विभागात नैसर्गिक शेती अभियानाला गती मिळाली असून शेतकरी यात सहभागी होत आहेत. नैसर्गिक शेती अभियानात सन २०२५-२६ मध्ये कृषी विभागाच्या पुणे विभागांतर्गत पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील २६ हजार २०० लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून त्यासाठी १३ कोटी ९५ लाख रुपये इतके अनुदान वितरीत करण्यात आले. तर कोल्हापूर विभागांतर्गत सातारा जिल्ह्यातील ६ हजार ७५० लाभार्थ्यांना ३ कोटी ५५ लाख रुपये इतके अनुदान वितरीत करण्यात आले. पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येकी ६ हजार ७५० शेतकरी तर अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ हजार ७०० शेतकऱ्यांनी लाभ घेतला असून यामध्ये पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना ३ कोटी २० लाख ६२ हजार रुपये, सोलापूर जिल्ह्यात ३ कोटी ९४ लाख २१ हजार, सातारा जिल्ह्यात ३ कोटी ५४ लाख ८५ हजार तर अहिल्यानगर जिल्ह्यात ६ कोटी ८० लाख ५७ हजार रुपये इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षात या अभियानांतर्गत या चार जिल्ह्यात एकूण २९ लाख ४३ हजार रुपये इतका खर्च झाला असून २ हजार ५१ शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे. नैसर्गिक शेतीमुळे जमिनीचे आरोग्य सुधारते, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते, जलसंधारणास चालना मिळते तसेच पर्यावरण संवर्धनासही मोठी मदत होते. रसायनमुक्त अन्नधान्याच्या वाढत्या मागणीमुळे अशा उत्पादनांना बाजारपेठेत चांगली संधी उपलब्ध होत असून ग्राहकांनाही सुरक्षित व दर्जेदार अन्न उपलब्ध होत आहे.

शेतकऱ्यांची खरी कर्जमुक्ती ही केवळ कर्जमाफीत नसून शेतीचा खर्च कमी करून उत्पन्नात शाश्वत वाढ साधण्यात आहे. नैसर्गिक शेती अभियान या दृष्टीने प्रभावी माध्यम ठरत असून, शेतकऱ्यांना आत्मनिर्भर आणि सक्षम बनविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. शेतीमधील वाढता उत्पादन खर्च, रासायनिक निविष्ठांवरील वाढते अवलंबित्व आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक अडचणी या पार्श्वभूमीवर नैसर्गिक शेती अभियान शेतकऱ्यांसाठी मैलाचा दगड ठरत असून नैसर्गिक शेती अभियान हे शेतकरी कर्जमुक्ती, आर्थिक समृद्धी आणि पर्यावरण संरक्षण यांचा प्रभावी संगम ठरत असून, ग्रामीण विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात करणारे परिवर्तनकारी अभियान म्हणून पुढे येत आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. फक्त गरज आहे ती अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होण्याची, आणि त्यासाठी कृषी विभागाचे प्रयत्न आणि शेतकऱ्यांची साथ अशी जोड मिळण्याची.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जीवे मारण्याची धमकी देणारास अटक

चाकण (दैनिक संध्या) : सिक्युरिटी व्यवसाय बंद करण्याची व जीवे ठार मारण्याची धमकी देत खंडणी उकळणाऱ्या रेकॉर्डवरील खंडणी बहाद्दराला खंडणी विरोधी पथकाने सापळा रचून बेड्या ठोकल्या. त्याच्याकडून एकूण ११ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीकांत शामराव बाबर (वय - ४४, रा. समर्थनगर, नवी सांगवी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली. बाबर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून खंडणी विरोधी पथकाने महेश सखाराम शिरोळे यास खंडणी स्वीकारताना रंगेहाथ पकडले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेश शिरोळे याने मागील महिन्यातील (दि.२५ ते २९) जून दरम्यान फिर्यादी श्रीकांत बाबर यांना स्वतःच्या मोबाईलवरून वारंवार संपर्क साधून सिक्युरिटीचा व्यवसाय सुरू ठेवायचा असेल तर सुरुवातीला १० लाख, त्यानंतर ८ लाख, ७ लाख आणि शेवटी ६ लाख रुपये द्यावे लागतील, अन्यथा व्यवसाय बंद पाडू असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली. चाकणमध्ये माझी मोठी दहशत आहे, पैसे दिले नाहीत तर खल्लास करून टाकीन," अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाने सापळा रचला. ठरल्या प्रमाणे तक्रारदाराच्या कंपनीतील सुपरवायझर संदीप कणसे यांच्या माध्यमातून ३ लाख रुपयांचे बनावट बंडल तयार करण्यात आले. त्यामध्ये काही खऱ्या नोटा व उर्वरित डमी नोटांचा समावेश करून आरोपीला देण्यात आल्या. मंगळवारी (दि.३० जून ) सायंकाळी सुमारे ६ वाजता आळंदी - पुणे रस्त्यावरील मॅक्झिन चौकाजवळील स्वच्छतागृह परिसरात आरोपी मसना ऊर्फ महेश सखाराम शिरोळे (वय २८, रा. मेदनकरवाडी, ता. खेड) हा ३ लाख रुपयांची खंडणी स्वीकारताना पोलिसांनी रंगेहाथ ताब्यात घेतले. कारवाई दरम्यान आरोपीकडून एकूण ११ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई खंडणी विरोधी पथकाने केली.

### भारती एअरटेलने नेटवर्क कव्हरेजचा विस्तार करून कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत केली

जम्मू/श्रीनगर (दैनिक संध्या) : भारती एअरटेलने अमरनाथ यात्रेसाठी आपल्या मोबाईल नेटवर्कचा विस्तार केल्याची घोषणा केली आहे. यामुळे यात्रेकरू, सुरक्षा दल आणि स्थानिक प्रशासनाला अधिक चांगली आणि विश्वासार्ह मोबाईल कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. एअरटेलने चंदनवाडी, पिस्सू टॉप आणि बेताब व्हॅली येथे नवीन मोबाईल नेटवर्क साइट्स सुरू केल्या आहेत. त्यामुळे पहलगाम मार्गावर आता मजबूत नेटवर्क उपलब्ध झाले आहे. यापूर्वीच बालटाल मार्गावर एअरटेलची सेवा उपलब्ध होती. या विस्तारामुळे पवित्र अमरनाथ गुहेपर्यंतच्या संपूर्ण प्रवासात यात्रेकरूंना अखंड मोबाईल कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. अमरनाथ यात्रेदरम्यान दळणवळणाची सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी एअरटेलने संबंधित सरकारी यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने हे नेटवर्क उभारले आहे. या विस्तारित नेटवर्कमुळे लाखो भाविकांना विश्वासार्ह व्हॉइस आणि डेटा सेवा मिळेल. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधणे अधिक सोपे होईल आणि डिजिटल सेवांचा अधिक चांगला लाभ घेता येईल. भारती एअरटेलचे जम्मू-काश्मीर विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीओओ) विक्रम आरएस म्हणाले, "एअरटेलमध्ये आम्ही कठीण भौगोलिक भागातही लोक, समुदाय आणि अत्यावश्यक सेवांना जोडण्यासाठी कायम कटिबद्ध आहोत. अमरनाथ यात्रेसाठी पहलगाम आणि बालटाल या दोन्ही मार्गांवर नेटवर्कचा विस्तार करणे हे जम्मू-काश्मीरमधील आमच्या सातत्यपूर्ण गुंतवणुकीचे आणि यात्रेकरू, सुरक्षा दल तसेच प्रशासनाला संपूर्ण यात्रेदरम्यान विश्वासार्ह कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे." अत्यंत आव्हानात्मक आणि दुर्गम भागांमध्येही एअरटेल सातत्याने आपल्या नेटवर्कचा विस्तार करत आहे. तसेच, देशातील कनेक्टिव्हिटीच्या अडचणी दूर करून भारताच्या डिजिटल परिवर्तनाला गती देण्यासाठी कार्यरत आहे.

### पवना बंदिस्त जलवाहिनी योजना सर्वांना विश्वासात घेऊन मार्गी लागणार : श्रीरंग बारणे



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येला उपलब्ध पाणी अपुरे पडत आहे. त्यामुळे सर्वांना विश्वासात घेऊन आणि कोणावरही अन्याय न करता पवना बंदिस्त जलवाहिनी योजना मार्गी लावण्याची सकारात्मक भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने ही योजना मार्गी लागेल, असा विश्वास मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी मुंबईत झालेल्या या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे, सुनील शेळके आणि माजी आमदार बाळा भेगडे तसेच पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पवना बंदिस्त जलवाहिनी योजना मार्गी लागणे आवश्यक आहे. ही योजना करताना १८ गावाच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा. त्यासाठी आताच तिसरी जलवाहिनी टाकावी. कोणावरही अन्याय होऊ देऊ नये. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यात यावा. कोणताही प्रश्न प्रलंबित न ठेवता योजना मार्गी लावावी. महापालिका, राज्य शासन योजना मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करत असताना दुसरीकडे किवळेत बंदिस्त जलवाहिनीतील पाईप बांधकाम विभागाच्या संगनमताने काढण्यात आले आहेत. यावर योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे.


**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना क्र. ०४/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य विभाग बारामती उर्जाभवन यांच्या अखत्यारीतील कामासाठी २०२६-२७ साठी पात्र बोलीदाता/एजन्सीजकडून निविदा क्र. टी-००६ ते ००७/२०२६-२७ करिता बोली (बीड्स) मागविण्यात येत आहेत. निविदा फक्त इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीमधूनच प्रक्रिया केली जातील आणि महावितरणच्या कामकाजासाठी ई-निविदा प्रणालीवर नोंदणी केलेल्या विक्रेत्यांसाठी खुली असेल. बीड कागदपत्रे ०४.०७.२०२६ ते १०.०७.२०२६ दुपारी ०१.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. निविदा सादर करण्यासाठी मुदत १०.०७.२०२६ दुपारी ०३.०० पर्यंत आहे. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या संकेतस्थळावर **www.mahadiscom.in** ला भेट द्यावी बोलीदातांना या आणि भविष्यातील ई-निविदा साठी स्वत:ची नोंदणी करणे आवश्यक आहे.

**PRO/BMTZ/59/2026-27**

कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग बारामती


# अॅमेझॉन एमएक्स प्लेअरचे रक्तांचल सिझन ३ सह पुनरागमन

**रक्तांचल सिझन ३ लवकरच अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य स्ट्रिमिंग**

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

अॅमेझॉन एमएक्स प्लेअर, भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज त्याच्या प्रेक्षक-पसंतीचा राजकीय गुन्हेगारी थरारपट, रक्तांचलच्या बहुप्रतिक्षित तिसऱ्या सिझनची घोषणा केली. ज्यात भारतीय स्ट्रीमिंगच्या सर्वात मनोरंजक प्रतिस्पर्ध्यांपैकी एकाच्या पुढच्या अध्यायात एक मनोरंजक प्री-टीझर आहे. रितम श्रीवास्तव दिग्दर्शित, रक्तांचल सिझन 3 मध्ये राजेश कुमार, करण पटेल, विक्रम कोचर आणि माही गिल यांच्या प्रमुख भूमिकांसह निकितिन धीर तसेच क्रांती प्रकाश झा त्यांच्या लोकप्रिय मुख्य भूमिकांमध्ये पुन्हा एकदा झळकले आहेत. सत्य घटनांपासून प्रेरित, नाट्यमय मालिका पूर्वांचलच्या, तीव्र पार्श्वभूमीवर आधारित आहे विजय सिंग आणि वसीम खान यांच्यातील अॅक्शन-पॅक फेस-ऑफ सुरू ठेवून फ्रँचायझीमधील सर्वात स्फोटक भाग असल्याचे वचन देते. प्रेक्षकांना पुढे काय आहे याची झलक देताना, पहिले दर्शन अशा अध्यायाचे संकेत देते जो पूर्वीपेक्षा अधिक अस्थिर, अधिक वैयक्तिक आणि अधिक धोकादायक आहे. सन 2020 मध्ये रक्तांचलचा पहिला सिझन प्रदर्शित झाल्यापासून, विजय सिंग तसेच वसीम खान यांच्या कथेला त्यांच्या जागतिक उभारणीसाठी, भावनिकदृष्ट्या प्रेरित संघर्षासाठी आणि 80च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळातील सत्तासंघर्षाचे चित्रण करण्यासाठी निष्ठावान प्रेक्षक मिळाले. आगामी सिझनसह, धोका वाढतो, संघर्ष तीव्र होतो आणि सत्तेचा संघर्ष पूर्वीपेक्षा अधिक खोलवर चालतो. युतीबदल होताना, निष्ठांची चाचणी घेतली जाते आणि सूडबुद्धी केंद्रस्थानी येते, रक्तांचल सिझन 3 कथेतील एक शक्तिशाली नवीन अध्याय सादर करण्यासाठी सज्ज आहे. ज्यामुळे कथा तिच्या आतापर्यंतच्या सर्वात रोमांचक टप्प्यात जाईल.




अॅमेझॉन एमएक्स प्लेअरचे डायरेक्टर आणि हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, "अॅमेझॉन एमएक्स प्लेअरवर, आम्ही आकर्षक आणि स्पष्टपणे भारतीय असलेल्या कथा वैविध्यासाठी प्रेक्षकांना वचनबद्ध आहोत. रक्तांचल ही आमच्या सर्वात आवडत्या गुन्हेगारी फ्रँचायझींपैकी एक आहे. सिझन 3 सह, आम्ही केवळ प्रेक्षकांनी वर्षानुवर्षे गुंतवलेल्या जगाचा विस्तार करीत नाही तर वसीम खान आणि विजय सिंग यांच्यातील संघर्षाच्या उत्पत्तीचा देखील आढावा घेत आहोत. हा पुढचा अध्याय प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत आणि आगामी वाटचाल अनुभवण्यासाठी आणखी वाट पाहू शकत नाही." फ्रँचायझीच्या पुनरागमनाबद्दल बोलताना, दिग्दर्शक रितम श्रीवास्तव म्हणाले, "रक्तांचलला नेहमीच प्रेक्षकांशी जोडणाऱ्या गोष्टींपैकी एक म्हणजे सर्व गुन्हेगारी आणि संघर्षाच्या खालच्या थराला, हे शेवटी लोक, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, असुरक्षितता, निष्ठा आणि त्यांनी केलेल्या निवडीचे परिणाम याबद्दल आहे. सिझन 3 सह, आम्हाला अधिकच पदर उलगडून दाखवायचे होते आणि वसीम तसेच विजयच्या शत्रुत्वाच्या भावनिक व मानसिक मुळांवर पुन्हा नजर टाकायची होती. हा अध्याय त्याच्या कथाकथनामध्ये अधिक गडद, अधिक तीव्र आणि प्रचंड वैयक्तिक आहे. अॅमेझॉन एमएक्स प्लेयरबरोबर सहकार्य म्हणजे दूरदृष्टीला आकारण्यात महत्त्वाची भूमिका ठरणार आहे. कारण ते प्रामाणिकपणा, प्रमाण आणि प्रभावासह मूळ कथेला 'हिरो' बनविण्याची प्रक्रिया सुरू ठेवतात." रक्तांचल सिझन 3 लवकरच केवळ अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य स्ट्रीम होईल, जो मोबाइल डिव्हाइसेस, कनेक्टेड टीव्ही, अॅमेझॉन शॉपिंग अॅप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही, जिओटीव्ही आणि एअरटेल एक्सस्ट्रीमवर उपलब्ध आहे.

## एचएमएचकडून पुण्यातील ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचा विस्तार

**नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना देण्यासाठी नवीन कार्यालयात स्थलांतर**

**पुणे (दै. संध्या) :**

के-12 शिक्षण तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपनी एचएमएचने आज पुण्यातील आपल्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरच्या (जीसीसी) विस्ताराची घोषणा केली आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक सकारात्मक परिणाम निर्माण करण्याच्या उद्देशाने हे सेंटर सातत्याने प्रगती आणि विकास करत आहे आणि आता नवीन व मोठ्या कार्यालयात स्थलांतरित होत आहे.

पुण्यातील शिवाजीनगर येथील हे नवीन कार्यालय आता सुरू झाले असून 24,000 चौरस फूट क्षेत्रफळात विस्तारलेले आहे. यामध्ये 230 हून अधिक कर्मचाऱ्यांसाठी आसनक्षमता, कोलाबोरेटिव्ह (एकत्रित काम करण्यासाठी) आणि हायब्रीड वर्कस्पेसेस, तसेच भविष्यातील वाढीसाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. यामुळे पुणे टीमला नवीन प्राधान्यक्रम आणि संधींवर काम करण्यासाठी आवश्यक जागा आणि पायाभूत सुविधा मिळणार आहेत.



"आमच्या पुणे सेंटरची यशोगाथा प्रत्यक्षात एकात्मिक सहयोगाची कथा आहे. गेली अनेक वर्षे आम्ही अत्यंत प्रतिभावान टीम तयार केली आहे, जी गुंतागुंतीच्या आव्हानांवर मात करण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना देण्यासाठी वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये, विभागांमध्ये आणि शाखांमध्ये उत्तम समन्वय राखून काम करते. आमचे नवीन डिझाइन केलेले कार्यालय अधिक चांगला संपर्क, सर्जनशीलता आणि सांघिक कामाला प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. हे कार्यालय व्यक्तींना प्रभावीपणे एकत्र काम करण्यासाठी आणि जगभरातील शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता प्रभावी शैक्षणिक सोल्यूशन्स विकसित करत राहण्यासाठी उत्तम वातावरण प्रदान करेल," असे एचएमएच टेक इंडियाच्या सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगच्या एसव्हीपी (सीनियर व्हाईस-प्रेसिडेंट) आणि कंट्री मॅनेजर जया वाधवानी म्हणाल्या.

या विस्ताराच्या मागे सेंटरची झालेली वेगवान वाढ हे मुख्य कारण आहे: तंत्रज्ञान आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील एक्सलन्स सेंटर म्हणून मे 2023 मध्ये सुरू झाल्यापासून पुणे टीमने गेल्या तीन वर्षांत शून्यावरून थेट 300 कर्मचाऱ्यांचा टप्पा गाठला आहे. याच वेगवान वाढीमुळे सातत्यपूर्ण संशोधन आणि सहयोगाला पाठबळ देण्यासाठी मोठ्या कार्यालयाची गरज निर्माण झाली होती.

एचएमएच भारतातील टॅलेंट आणि पुण्यातील तंत्रज्ञान व नाविन्यपूर्ण परिसंस्थेमधील आपली गुंतवणूक वाढवत राहण्याचे नियोजन करत आहे.

## आमदार खासदार फोडण्यासाठी राम मंदीर लुटीचा पैसा वापरला

**उद्धव ठाकरे यांचा खळबळजनक आरोप**

**मुंबई (दै. संध्या) :**

राम मंदिरातील दानपेटीमधील लुटीचा पैसा राज्यातील आमदार खासदार फोडण्यासाठी वापरण्यात आला. असा खळबळजनक आरोप करून ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर पत्रकार परीषदेत घणाघाती टिका केली. देशात खासदार आणि आमदार फोडाफोडासाठी राम मंदिर लुटीचा पैसा वापरला का असा खळबळजनक आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. या गंभीर आरोपासोबतच लूट करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. तर याप्रकरणी आता मोठे आंदोलन छेडणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला. आज राम मंदिर वेगळ्या गोष्टीने चर्चिला जात आहे. दरोडेखोरी सुरू आहे. आमदार खासदार फोडले जात आहे. त्याला ऑपरेशन नाव दिलं जात आहे. आता ऑपरेशन राम मंदिर भाजप करत आहे का. या बातम्या दाखवल्या जात असतील नसतील. पण चोरी होत आहे. राम मंदिरावर दरोडा टाकला जात आहे. काहींच्या मते हा चोरीचा पैसा इतर पक्ष फोडण्यासाठी केला जात आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. त्यांच्या या आरोपाने खळबळ उडाली आहे.

राम मंदिर दानपेटीतील चोरी विरोधात उद्धव सेनेकडून आंदोलन रविवारी संध्याकाळी ५ वाजता दादर कबुतरखान्याजवळ राम मंदिर आहे. तिथे तमाम हिंदूंना ज्यांना ज्यांना वाटतं भाजपच्या कालखंडात हिंदुत्व धोक्यात आलं म्हणून मोर्चे काढले त्यांना आमंत्रित करतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले. त्यांनी राम भक्त आणि हिंदूंना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी केले.

## अॅमेझॉन प्राईम डे निमित्त वनप्लसच्या आकर्षक सवलती; वनप्लस १३ सर्वात कमी किमतीत

**पुणे (दै. संध्या) :**

वनप्लसने अॅमेझॉन प्राईम डे २०२६ निमित्त विविध स्मार्टफोन, टॅब्लेट आणि ध्वनी उपकरणांवर विशेष सवलती जाहीर केल्या आहेत. या सवलती ४ जुलैच्या मध्यरात्रीपासून लागू होणार असून ग्राहकांना किंमत कपात, बँक सवलत आणि विनाव्याज हप्त्यांच्या सुविधा मिळणार आहेत.

यंदाच्या विक्रीत वनप्लस १५ आर, वनप्लस १३ एस, वनप्लस १३, वनप्लस नॉर्ड सीई६, वनप्लस पॅड ४ आणि वनप्लस नॉर्ड बड्स ४ ही उत्पादने विशेष आकर्षण ठरणार आहेत. विशेष म्हणजे, वनप्लस १३ हा स्मार्टफोन आतापर्यंतच्या सर्वात कमी ४९,९९९ रुपयांच्या प्रभावी किमतीत उपलब्ध होणार आहे.

वनप्लस १५ आरवर ३ हजार रुपयांची किंमत कपात आणि ३ हजार रुपयांपर्यंत बँक सवलत मिळून त्याची प्रभावी किंमत ४८,९९९ रुपये इतकी राहणार आहे. तसेच वनप्लस १३ एसवर ५ हजार रुपयांची किंमत कपात आणि ३ हजार रुपयांची बँक सवलत मिळून तो ४६,९९९ रुपयांत उपलब्ध होईल. नॉर्ड मालिकेतील वनप्लस नॉर्ड सीई ६ हा स्मार्टफोन २९,९९९ रुपयांत, तर नॉर्ड सीई६ लाइट



२२,९९९ रुपयांच्या प्रारंभिक प्रभावी किमतीत उपलब्ध होणार आहे. टॅब्लेट विभागात वनप्लस पॅड लाइट १६,९९९ रुपयांत, तर नव्याने दाखल झालेला वनप्लस पॅड 4 55,999 रुपयांत विक्रीस उपलब्ध असेल. या टॅब्लेटसोबत 5,499 रुपयांचा स्टायलो प्रो कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय दिला जाणार आहे. ध्वनी उपकरणांमध्ये वनप्लस बड्स प्रो 3 यांची प्रभावी किंमत 9,999 रुपये, तर वनप्लस नॉर्ड बड्स 4 मर्यादित कालावधीसाठी 3,099 रुपयांत उपलब्ध असतील. ग्राहकांना निवडक बँकांच्या कार्डांवर तात्काळ सवलत तसेच सहा महिन्यांपर्यंत विनाव्याज हप्त्यांचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. ही सर्व उत्पादने अॅमेझॉन, वनप्लसची अधिकृत संकेतस्थळ, वनप्लस स्टोअर अनुप्रयोग आणि वनप्लस अनुभव केंद्रांसह निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध असतील.

## मास्टरकार्डच्या 'सिर्फ कार्ड नहीं, मास्टरकार्ड'सह रोजचा खर्च अधिक स्मार्ट आणि अधिक रिवॉर्डिंग क्षणांमध्ये बदलतो

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

mastercard

अगदी वेगाने ऑनलाईन खरेदी करणारे खरेदीदार आणि विकेंड गेटअवेज पासून ते रोजची बीले, सणासूदीची खरेदी आणि रोजचा खर्च असो भारतीय लोक हे केवळ रोजच्या पेमेंट पेक्षा अधिकची अपेक्षा ठेवतात. याच गोष्टीचा लाभ घेत आज मास्टरकार्ड तर्फे 'सिर्फ कार्ड नहीं, मास्टरकार्ड' या मोहिमेच्या सुरुवातीची घोषणा केली असून या उत्साही मोहिमेच्या माध्यमातून कशा प्रकारे एका कार्डाचा उपयोग व्यवहार करण्यापेक्षा अधिक करु शकतो हे कळवत आहे. ही मोहिम भारतातील रोजच्या स्मार्ट खरेदीचा साथीदार म्हणून मास्टरकार्डला प्रस्थापित करत आहे, ज्यामुळे विश्वसनीय सुरक्षा, जागतिक पोहोच, चांगल्या ऑफर्स आणि रोजच्या कामातील संस्मरणीय अनुभव ग्राहकांना मिळतो.

अशा वेळी जेंव्हा भारतातील ग्राहक पूर्वीपेक्षा अधिक डिजिटल, अधिक जाणकार आणि पैशांची किंमत ओळखणारे झाले आहेत, तेंव्हा पेमेंटचे पर्याय हे लोक कशा प्रकारे नियोजन करतात, खरेदी करतात, प्रवास करतात आणि स्वतःसाठी उपयोग करुन घेतात, याचाच एक भाग बनत चालले आहेत. ग्राहक आपल्या नेहमीच्या खर्चातून अधिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत असताना; मिळणाऱ्या ऑफर्स, रिवॉर्ड्स आणि पेमेंटचे विविध पर्याय समजून घेतांना अनेकदा गोंधळात पडलेले दिसू शकतात. त्यांना मूल्य शोधण्यासाठी, आत्मविश्वासाने पैसे भरण्यासाठी आणि प्रत्येक खरेदी अधिक सार्थक वाटेल अशा समृध्द अनुभवांचे दरवाजे खुले करण्यासाठी सोपे मार्ग हवे आहेत.

ही मोहीम आधुनिक भारतीय जीवनातील अगदी सहज ओळखता येतील अशा क्षणांवर आधारित नऊ शॉर्ट फिल्म्सद्वारे समोर येते—जसे की बिले भरणे, प्रवासाचे बुकिंग करणे, ईएमआयवर खरेदी करणे, 'टॅप टू पे' चा वापर करणे, मर्चंट ऑफर्सचा शोध घेणे, खास अनुभवांचा आनंद घेणे आणि सुरक्षितपणे ऑनलाईन व्यवहार करणे इत्यादी. प्रत्येक लघुपट मास्टरकार्डच्या वेगवेगळ्या फायद्यावर प्रकाश टाकण्यासाठी अगदी साध्या, दैनंदिन जीवनातील घटनांचा वापर करतो, ज्यामुळे ब्रँडचे आश्वासन प्रत्यक्ष, जवळचे आणि लक्षात ठेवण्यास सोपे बनते. एकत्रितपणे, हे लघुपट मास्टरकार्डला केवळ पाकिटातील एक कार्ड म्हणून नाही, तर ग्राहकांना दररोज अधिक हुशारीने, सुरक्षितपणे आणि अधिक चांगल्या प्रकारे खर्च करण्यास मदत करणारा एक भागीदार म्हणून सादर करतात.

"आजचा ग्राहक केवळ पैसे कसे भरायचे हेच ठरवत नाही, तर तो आपल्या खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयामधून अधिक फायदा कसा मिळवायचा, हे देखील ठरवतो आहे. मग ते योग्य मूल्य शोधणे असो, आत्मविश्वासाने पैसे भरणे असो किंवा अविस्मरणीय अनुभवांचे दरवाजे खुले करणे असो; प्रत्येक खरेदीतून आपल्याला जास्तीत जास्त फायदा मिळावा अशी त्यांची इच्छा असते," असे मास्टरकार्डच्या दक्षिण आशिया, मार्केटिंग आणि कम्युनिकेशन्स विभागाच्या व्हाईस प्रेसिडेंट, लावणी अगरवाल म्हणाल्या. "'सिर्फ कार्ड नही, मास्टरकार्ड' हे ग्राहकांना अधिक हुशारीने खर्च करण्यास आणि ते आधीपासूनच खर्च करत असलेल्या पैशांमधून अधिक फायदा मिळवून देण्यास मदत करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. अब्जावधी स्वप्नांच्या गतीशी मेळ घालण्यासाठी तयार केलेली ही मोहीम, आमचे हे आश्वासन अभिमानाने अगदी तुमच्यातीलच वाटेल अशा पद्धतीने जिवंत करते आणि त्याच वेळी सुरक्षित व विश्वासार्ह पेमेंट अनुभवांचे मार्ग मोकळे करण्याच्या मास्टरकार्डच्या जागतिक आश्वासनाशी प्रामाणिक राहते."

ही मोहिम संपूर्ण भारतातील सर्व सामाजिक माध्यमे, डिजिटल टिव्ही, ओटीटी मंच आणि सिनेमा थिएटर्स मध्ये पुढील आठ आठवड्यांसाठी प्रसारित करण्यात येणार असून हे लघुपट विविध भारतीय भाषांमध्येही प्रसारित करण्यात येणार आहेत.

# येरवडा कारागृह अधिकारी-कर्मचारी व कुटुंबीयांसाठी आरोग्य शिबिर

**पुणे (दै. संध्या) :**

राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधत सह्याद्री हॉस्पिटल, शास्त्रीनगर, येरवडा (मणिपाल हॉस्पिटल्स नेटवर्क) यांच्या वतीने येरवडा मध्यवर्ती कारागृह आणि येरवडा खुले कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ व २ जुलै २०२६ या



कालावधीत सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी हे चोवीस तास जबाबदारीचे कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी, विविध आजारांचे लवकर निदान व्हावे आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मा. डॉ. सुहास वारके (आयपीएस), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, मा. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, तसेच कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. शिबिराचे उद्घाटन कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी कारागृह कर्मचारी वर्षभर अत्यंत तणावपूर्ण वातावरणात सेवा बजावत असल्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी अशा स्वरूपाच्या आरोग्य शिबिरांचे आयोजन ही काळाची गरज असून भविष्यातही अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे होते. सह्याद्री हॉस्पिटलच्या संचालिका नेहा सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पथकाने शिबिराचे उत्कृष्ट नियोजन केले.

"निरोगी कर्मचारी, सशक्त संस्था, निरोगी समाज" या संकल्पनेवर आधारित या शिबिरात विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभागी होत मोफत तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन केले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर ऑनलाइन भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत

## थकबाकीदारांवर करण्यात येणार जप्तीची कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत जे मालमत्ताधारक चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ चा मालमत्ता कर ऑनलाइन पद्धतीने भरतील, त्यांना सामान्य करावर ४ टक्के सवलत दिली जाणार आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, त्यांनी तत्काळ ऑनलाइन कर भरून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून करण्यात आले आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरणा, उपलब्ध सवलत योजना, कर भरण्याची अंतिम मुदत तसेच थकबाकीबाबतची माहिती एसएमएसद्वारे वेळोवेळी मालमत्ताधारकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. यासोबतच टेली कॉलिंगच्या माध्यमातून मालमत्ताधारकांशी थेट संपर्क साधून त्यांच्या कर भरण्याच्या स्थितीची माहिती देण्यात येत आहे. उपलब्ध सवलतींचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते, व ऑनलाइन आणि प्रत्यक्ष कर भरण्याच्या सुविधांची माहितीही देण्यात येते. मालमत्ताधारकांकडून प्राप्त होणाऱ्या शंका व अडचणींची नोंद घेऊन त्यांचे संबंधित विभागामार्फत निराकरण करण्यात येते. डेटा-आधारित संवाद प्रणालीचा अवलंब केल्यामुळे प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत आवश्यक माहिती नियोजनबद्ध पद्धतीने पोहोचविणे शक्य झाले आहे. त्याचबरोबर जनजागृती, थेट संवाद आणि माहितीचे नियमित प्रसारण यामुळे मालमत्ता कर भरण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळण्यास मदत झाली आहे. मात्र अद्यापही ज्या मालमत्ताधारकांनी कर भरला नाही, त्यांच्यासाठी आता ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन मालमत्ता कर भरल्यास सामान्य करावर ४ टक्के सवलत देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांवर जप्तीची कारवाई सुरु केली आहे. या मोहिमेअंतर्गत १८ विभागीय कार्यालयांमार्फत आतापर्यंत ३५ हजाराहून अधिक मालमत्ताधारकांना जप्तीपूर्वी नोटीस बजावण्यात आली आहे. ज्या थकबाकीदारांना नोटीस देऊनही पहिल्या तिमाहीत कर भरला नाही अशा मालमत्तांवर कारवाई करण्यास कर संकलन विभागाने सुरवात केली आहे. यामध्ये बिगर निवासी,औद्योगिक,मिश्र मालमत्ताधारकांवर थेट जप्ती करणे कारवाई करण्यात येणार तर निवासी मालमत्ता धारकांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात येणार आहे.



मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांविरुद्ध नियमानुसार कारवाई सुरू करण्यात आली आहे. बिगर निवासी औद्योगीक, मीश्र थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.तसेच निवासी मालमत्तांच्या थकबाकीदारांचे नळ जोडणी खंडित करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.. त्यामुळे थकबाकीदारांनी कोणतीही प्रशासकीय कारवाई टाळण्यासाठी तात्काळ मालमत्ता कराचा भरणा करून उपलब्ध सवलतीचा लाभ घ्यावा.

**- सचिन पवार, उपायुक्त, कर संकलन विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पहिल्या तिमाहीत मोठ्या संख्येने मालमत्ताधारकांनी वेळेत मालमत्ता कर भरून सवलत योजनेचा लाभ घेतला. यासाठी सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार. ज्यांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी ऑनलाईन कर भरून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. आपला कर हा शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा वाटा आहे. चला, जबाबदार नागरिक म्हणून वेळेत कर भरून पिंपरी-चिंचवडच्या विकासात सहभागी होऊया.

**– रवी लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**


पिंपरी-चिंचवडकरांनी महापालिकेवर विश्वास ठेवत पहिल्या तिमाहीत ३ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी ऑनलाईन मालमत्ता कर भरून सवलत योजनेचा लाभ घेतला. या सकारात्मक प्रतिसादाबद्दल सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार. ज्यांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी ऑनलाईन मालमत्ता कर भरून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. वेळेत कर भरणे म्हणजे शहराच्या विकासात थेट सहभाग नोंदविणे होय.

**– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

**वर्षनिहाय पहिल्या तिमाहीत ऑनलाइन कर भरणारे मालमत्ताधारक**

आर्थिक वर्ष - मालमत्ताधारक
२०२०-२१ - ८८ हजार ९०
२०२१-२२ - १ लाख ११ हजार १
२०२२-२३ - १ लाख २८ हजार १५
२०२३-२४ - २ लाख ९ हजार ६२५
२०२४-२५ - २ लाख ६० हजार ७५७
२०२५-२६ - ३ लाख ३७ हजार
२०२६- २७ – ३ लाख ४७ हजार ५६४

## थोडक्यात पण महत्वाचे...




### काळेवाडीत हॉटेलचे कुलूप तोडून 60 हजारांची रोकड लंपास; आरोपीला अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : काळेवाडीत एका हॉटेलचे कुलूप तोडून ६० हजार रुपयांची रोकड लंपास करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी काळेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अधिकारीराव विश्वासराव भोसले (वय ५३, रा. ज्योतिबा नगर, काळेवाडी) यांचे शिवकल्याण भोजनालय हे हॉटेल एम.एम. चौक, काळेवाडी येथे आहे. २९ जून रोजी रात्री अज्ञात चोरट्याने हॉटेलच्या मागील दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यानंतर कपाटातील तसेच गल्ल्यातील एकूण अंदाजे ६० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. या घटनेची तक्रार काळेवाडी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. या प्रकरणी शंकर सोपान सगर (वय १८, रा. जगताप नगर, थेरगाव) याला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चव्हाण करीत आहेत.

### भुशी डॅम ओव्हरफ्लो.. लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी वाढली

लोणावळा (दैनिक संध्या) : लोणावळा-खंडाळा परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावत पर्यटनस्थळांना नवसंजीवनी दिली आहे. गेल्या ४८ तासांत तब्बल २२९ मिमी पावसाची नोंद झाल्याने परिसरातील नद्या, ओढे आणि धबधबे तुडुंब भरून वाहत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रसिद्ध भुशी धरण ओव्हरफ्लो झाले असून, धरणावरून कोसळणाऱ्या पाण्याचा मनमोहक नजारा पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. सततच्या पावसामुळे लोणावळा परिसर हिरवाईने नटला असून, धुक्याची चादर, वाहणारे धबधबे आणि ओसंडून वाहणारे भुशी धरण यामुळे पर्यटकांना आकर्षित करत आहे. विशेषतः शनिवार-रविवारी पर्यटकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, धरण परिसरात पाण्याचा वेग वाढल्याने प्रशासनाने नागरिक व पर्यटकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धरणाच्या पाण्यात उतरू नये, सेल्फी काढताना धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे तसेच पोलिस व प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाच्या जोरदार आगमनामुळे लोणावळा-खंडाळा परिसरातील पर्यटन व्यवसायालाही चालना मिळाली असून, हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि स्थानिक व्यावसायिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### 1 हजार 280 विद्यार्थ्यांना तात्काळ पाठ्यपुस्तके द्या, दोषींवर कारवाई करा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिका व आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील सुमारे १,२८० विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊन १५ दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही शालेय पाठ्यपुस्तके उपलब्ध झालेली नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना तात्काळ पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करावा तसेच या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## पवना नदीतील प्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणात मासे मृतावस्थेत

पिंपरी (दै. संध्या)





■ तातडीने कारवाई करण्याची युवा नेते ऋषिकेश वाघेरे यांची मागणी

पिंपरी-चिंचवड शहरातील केजुदेवी मंदिर ते श्री मोरया गोसावी मंदिर या पवना नदीच्या परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पांढरा फेस साचत असल्याचे दिसून येत आहे. आता या प्रदूषणामुळे नदीतील मोठ्या प्रमाणात मासे मृतावस्थेत आढळून येत असून ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याची मागणी युवा नेते ऋषिकेश वाघेरे यांनी केली आहे. ऋषिकेश वाघेरे यांनी म्हटले आहे की, स्थानिक नागरिकांच्या मते, काही उद्योग किंवा व्यावसायिक आस्थापनांकडून कोणतीही प्रक्रिया न करता रासायनिक व सांडपाणी थेट पवना नदीत सोडले जात असल्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असून जलचरांच्या अस्तित्वावर गंभीर परिणाम होत आहे. नदीतील मासे मृतावस्थेत आढळून येत असल्याने पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. याशिवाय नदीकाठच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यालाही मोठा धोका निर्माण झाला असून दुर्गंधी आणि प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. यापूर्वीही नदीतील फेस आणि प्रदूषणाबाबत अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात न आल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनल्याची टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) आणि संबंधित शासकीय यंत्रणांनी तात्काळ घटनास्थळी पाहणी करून पाण्याचे नमुने तपासावेत, प्रदूषणास जबाबदार असलेल्या उद्योगांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवड पोलीस मुख्यालय उभारणीचा मार्ग मोकळा

पिंपरी (दै. संध्या)

■ ताथवडेतील २० हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा 'जीआर'; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने निर्णय




पिंपरी-चिंचवड शहराच्या सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील वळुमाता प्रक्षेत्रातील २० हेक्टर शासकीय जमीन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या स्वतंत्र व अत्याधुनिक मुख्यालयासाठी, परेड ग्राऊंड आणि इतर अनुषंगिक सुविधांसाठी भोगवटामूल्यरहित व महसूलमुक्त स्वरूपात हस्तांतरित करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय १ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आला.

शासन निर्णयानुसार या जमिनीवर पोलीस आयुक्तालयाचे आधुनिक मुख्यालय, परेड ग्राऊंड आणि आवश्यक प्रशासकीय व पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. संबंधित जमिनीचा वापर केवळ मंजूर उद्देशासाठीच करता येणार असून, तीन वर्षांच्या आत प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

“पिंपरी-चिंचवड शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा शासन निर्णय अत्यंत ऐतिहासिक आहे. ताथवडे येथील २० हेक्टर जागेवर आता स्वतंत्र आणि अत्याधुनिक पोलीस आयुक्तालय मुख्यालय, परेड ग्राऊंड व इतर आवश्यक सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासन निर्णयामध्ये ही जमीन भोगवटामूल्यरहित व महसूलमुक्त स्वरूपात उपलब्ध करून दिली असून, मंजूर उद्देशासाठीच तिचा वापर करणे, तीन वर्षांच्या आत प्रकल्प सुरू करणे आणि आवश्यक सर्व शासकीय परवानग्या घेऊन विकासकामे पूर्ण करण्याच्या स्पष्ट अटी आहेत. त्यामुळे हा प्रकल्प निश्चित कालमर्यादेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने साकार होईल, असा विश्वास आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या विषयाला प्राधान्य देत दिलेला शब्द पाळला, याचे समाधान वाटते.

**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

या निर्णयामागे झालेल्या पाठपुराव्यालाही महत्त्व आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या आठवड्यात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा विषय सविस्तर मांडण्यात आला होता. या बैठकीला पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे उपस्थित होते. या बैठकीची फलश्रुती झाली आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र पोलीस मुख्यालयाची गरज त्यांनीही अधोरेखित केली होती. बैठकीत शासन निर्णय तातडीने काढण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार अल्पावधीतच शासनाने मंजुरी जाहीर केली.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला स्वतंत्र, प्रशस्त आणि अत्याधुनिक मुख्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे पोलीस प्रशासनाचे कामकाज अधिक सक्षम होण्यास, प्रशिक्षण व नियोजनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यास मदत होणार आहे. वेगाने वाढणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, नागरिकांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गतिमान पोलीस यंत्रणेचा लाभ मिळणार आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या स्वतंत्र मुख्यालयासाठी आवश्यक जागा उपलब्ध व्हावी, यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी राज्य शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार आधुनिक पोलीस मुख्यालयाची आवश्यकता त्यांनी विविध बैठकीत ठामपणे मांडली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही त्यांनी प्रकल्पाची गरज अधोरेखित केली. त्यांच्या प्रशासनिक पाठपुराव्याला शासनाने सकारात्मक प्रतिसाद देत ताथवडे येथील २० हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला.

## श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्राथमिक व माध्यमिक शाळेचे उद्घाटन

पिंपरी (दै. संध्या)



“विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय शिक्षणाबरोबरच वाचन संस्कृती जोपासणे अत्यंत आवश्यक आहे, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि कौशल्य विकसित झाले तर त्यांची विचारशक्ती अधिक सक्षम होईल तसेच येणाऱ्या काळात महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी महापालिका विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कासारवाडी येथील 'श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्राथमिक व माध्यमिक शाळा' या नवीन, सुसज्ज व अत्याधुनिक शाळा इमारतीचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, नगरसदस्य जितेंद्र ननावरे, नगरसदस्या मनिषा लांडे, वर्षा जगताप, प्रतीक्षा जवळकर, रिटा सानप, श्रुती वाकडकर, माजी नगरसदस्य शाम लांडे, माऊली थोरात, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील प्रकाश जवळकर, राजेंद्र शेळके, रतन लांडगे, अशोक पगारे, रमेश लांडगे, ॲड.संजय गोडसे, भगवान धावटे, डॉ.महेश शेटे, शरद औटे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही इमारत उभारण्यात आली.

“अक्षर विश्व” ही संकल्पना महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत प्रभावीपणे राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांमध्ये विषयाविषयी गोडी निर्माण करण्यासाठी आणि शिक्षण अधिक परिणामकारक करण्यासाठी 'वारे गुरुजी पॅटर्न' देखील महापालिकेच्या शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार आहे. आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून महापालिकेच्या शाळा शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करतील असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

## शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्या सोबत : चेतन पवार

पिंपरी (दै. संध्या)

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनंतर पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन आहेर यांनी देखील शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. परंतु पिंपरी चिंचवड शहरातील सर्व शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेसोबत आहेत असा विश्वास शहर प्रमुख चेतन पवार यांनी मातोश्री येथे दिला. गुरुवारी (दि. २ जुलै) सकाळी चेतन पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी, चिंचवड, भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह मुंबईत मातोश्री वर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी शेकडो शिवसैनिक आणि युवा सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत पक्षाशी निष्ठा कायम असल्याचे सांगितले. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेत फूट पडणार असल्याच्या अफवांना पूर्ण विराम मिळाला आहे. यावेळी प्रमुख पदाधिकारी आणि चेतन पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्या समोर आपल्या भावना व्यक्त केल्या. सर्वांनी उद्धव आणि आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून पक्षावर निष्ठा कायम असल्याची हमी दिली.

# चिखली-मोशी परिसरात एसटी बस स्थानक उभारणार..!

### प्रताप सरनाईक यांचे तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश; प्रवासी वाहतूक सक्षमीकरणासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्याच्या उत्तर भागातील चिखली किंवा मोशी येथे आधुनिक एसटी बस स्थानक उभारण्याच्या मागणीची राज्य शासनाने तातडीने दखल घेतली आहे. भाजपाचे आमदार महेश किसनराव लांडगे यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रशासनाला या प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

आमदार महेश लांडगे यांनी दि. २५ जून रोजी परिवहन मंत्र्यांना निवेदन सादर करून चिखली किंवा मोशी परिसरातील आरक्षित जागेवर आधुनिक व सुसज्ज एसटी बस स्थानक उभारण्याची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित प्रस्तावाची तातडीने तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला दिल्या आहेत. विधानसभा पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार लांडगे यांनी आज परिवहन मंत्री सरनाईक यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सकारात्मक निर्णय घेत पुढील कार्यवाहीचे आदेश दिले.

या बैठकीनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांना तातडीने निर्देश देत, पुणे विभाग नियंत्रकांमार्फत सर्वेक्षण करून चिखली किंवा मोशी परिसरातील योग्य ठिकाणी नवीन एसटी बस स्थानक उभारणीची कार्यवाही जलदगतीने करण्याचे आदेश दिले. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांनी बस स्थानकासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबतही संबंधित स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या दशकात चिखली, मोशी, चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी, तळवडे आणि स्पाईन रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. त्यामुळे या भागातील लाखो नागरिकांना आंतरजिल्हा व राज्यांतर्गत प्रवासासाठी शहरातील इतर एसटी बस स्थानकांवर अवलंबून राहावे लागते. नवीन बस स्थानक उभारल्यास नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचण्यास मदत होईल, तसेच शहरातील विद्यमान बस स्थानकांवरील ताणही कमी होणार आहे.

“चिखली किंवा मोशी येथे आधुनिक एसटी बस स्थानक उभारण्याची मागणी ही पिंपरी-चिंचवडसह उत्तर पुणे जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या मागणीची तातडीने दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला त्वरीत कार्यवाहीचे निर्देश दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. या बस स्थानकामुळे नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि दर्जेदार प्रवासी सेवा मिळेल. हा प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात यावा, यासाठी शासन आणि संबंधित यंत्रणांकडे मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे.”

**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

चिखली-मोशी परिसर हा पुणे-नाशिक महामार्गालगत असून, वाकड-हिंजवडी परिसर मुंबई-बंगळुरू महामार्गाशी जोडलेला आहे. त्यामुळे या दोन्ही भागांपैकी योग्य ठिकाणी एसटी बस स्थानक उभारल्यास उत्तर पिंपरी-चिंचवडसह औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी, विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिवहन मंत्र्यांच्या निर्देशानंतर आता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रस्ताव पुढे नेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेजुरीच्या पालखी तळावर पूर्व तयारीला वेग

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत दिनांक 13 रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा मुक्कामी विसरणार आहे. या सोहळ्यासाठी पालखी तळावर विविध सुविधांची जय्यत तयारी सुरू आहे. जेजुरी गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावाकाठी जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने नऊ एकर जागेत पालखी तळ मागील चार वर्षांपूर्वी विकसित करण्यात आले आहे. 13 जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा जेजुरी मुक्कामी विसरणार आहे. तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत शिव आणि वैष्णव भक्तीचा मिलाफ होत असल्याने लाखो वारकरी भाविक येथे कुलदैवत खंडोबा देवाचे दर्शन घेत असतात. पालखी सोहळ्यात येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वच शासकीय विभागाच्या वतीने येथील पालखी तळावर जय्यत तयारी सुरू आहे. पालखी मैदानाचे सपाटीकरण, स्वच्छता, पार्किंग, पाणी, वीज आरोग्य, रस्ता ,शौचालये आदी सुविधांची तयारी सुरू आहे. जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, अधिकारी बाळासाहेब खोमणे, सुदर्शन काळेल, तसेच जेजुरी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील, सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार, सर्जेराव पुजारी आदी अधिकारी वर्गाने पालखी तळावरील सोयी सुविधांचा आढावा घेतला. पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने या सोहळ्यासाठी जर्मन पद्धतीचे मंडप, शौचालये, मार्गदर्शक फलक उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी सांगितले.

### जिल्हा परिषद भोईटेवाडी शाळेमध्ये केंद्रप्रमुखांचा दौरा

बारामती (दैनिक संध्या) : गटशिक्षण अधिकारी निलेश गवळी यांच्या मार्गदर्शनानुसार मुर्टी केंद्राच्या केंद्रप्रमुख सौ.राजश्री शेंडे यांनी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोईटेवाडी येथे नुकतीच भेट दिली.या भेटीदरम्यान त्यांना शिक्षकांच्या गुणवत्तेपूर्वक अध्यापन,विद्यार्थी केंद्री उपक्रम हे उपक्रम पहावयास मिळाले.तसेच मराठी शाळेवरील विश्वास अतिशय दृढ झाला आहे. याच विश्वासातून इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या मुलांनी मराठी शाळेत प्रवेश घेतला आहे.मराठी शाळेचे गुणवत्ता आणि शिक्षकांच्या समर्पित कार्याचा हा मोठा सन्मान आहे.शिक्षकांची निष्ठा,परिश्रम आणि समाजाशी असलेला सकारात्मक संवाद याचाच परिणाम आहे.या प्रेरणादायी कार्याबद्दल केंद्रप्रमुख यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोईटेवाडी चे मुख्याध्यापक रमेश चव्हाण, उपशिक्षिका सौ. स्वाती चव्हाण तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

### 1.9 किलो गांजाची झाडे जप्त; संशयितावर गुन्हा दाखल



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील तांबे गावात गांजाची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या एका शेतकऱ्याविरुद्ध जुन्नर पोलिसांनी कारवाई करत सुमारे १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी संबंधित शेतकऱ्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांनी दिली. १ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.४० वाजण्याच्या सुमारास तांबे येतील मुरलीधर धोंडू जोशी यांच्या घराशेजारील शेतामध्ये हिरव्या रंगाच्या नेटच्या आड गांजाच्या झाडांची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता गांजाची झाडे आढळून आली. या कारवाईत एकूण १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी मुरलीधर धोंडू जोशी रा. तांबे, आंबेदरावाडी, ता. जुन्नर यांच्याविरुद्ध (एनडीपीएस) अधिनियम, १९८५ मधील कलम २० (ब) (ii) (अ) व ८ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेऊन, पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गिजरे,हवालदार महेश भालेराव , कैलास केंद्रे, दीपक वणवे,अमोल सातपुते, पोलीस जवान दादा पावडे, श्रीराम शिंदे यांच्या पथकाने केली.

### कृषिरत्न अनिलतात्या मेहेर यांना 'यश जीवन गौरव' पुरस्कार प्रदान



नारायणगाव (दैनिक संध्या): कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय, दीर्घकालीन व समाजाभिमुख कार्याची दखल घेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा मानाचा 'यश जीवन गौरव पुरस्कार 2026 यंदा नारायणगाव ता. जुन्नर येथील ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष, कृषिरत्न अनिलतात्या मेहेर यांना प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात एअर मार्शल (नि.) व्ही. एन. गोखले यांच्या हस्ते अनिलतात्या मेहेर व त्यांच्या पत्नी मोनिका मेहेर यांनी स्वीकारला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे होते. या वेळी डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, ग्रामोन्नती मंडळाचे संचालक ऋषिकेश मेहेर, निलेश पाटे, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. राहुल घाडगे, डॉ. आनंद कुलकर्णी, डॉ. मिलिंद भुजबळ,प्रा. राधाकृष्ण गायकवाड,तसेच मेहेर कुटुंबीय आदि उपस्थित होते. कृषिरत्न अनिलतात्या मेहेर मागील अनेक दशकांपासून कृषी, ग्रामीण विकास, कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेतकरी प्रशिक्षण, शेतकरी सक्षमीकरण, कृषी उद्योजकता विकास, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार तसेच शाश्वत शेतीसाठी कार्यरत आहेत. जुन्नर हापूसला शिवनेरी हापूस मानांकन मिळण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. या पूर्वी राज्य शासनाच्या वतीने पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार,ग्रेप ग्रोवर्स फेडरेशन ऑफ इंडिया, पुणे आणि नॅशनल रिसर्च सेंटर फॉर ग्रेप्स, पुणे यांच्या वतीने द्राक्ष भूषण हा राष्ट्रीय पुरस्कार व शिवनेर भूषण आदि पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. अनिलतात्या मेहेर हे कृषी पदवीधर असून मागील अनेक वर्षांपासून शेतकरी व शेती समृद्धीसाठी कार्यरत आहेत. या सन्मानामुळे जुन्नर तालुक्यासह पुणे जिल्हा आणि राज्यभरातील शेतकरी, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, ग्रामोन्नती मंडळाचे पदाधिकारी, कृषी विज्ञान केंद्राचे अधिकारी व कर्मचारी तसेच विविध सामाजिक संस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आरोग्य क्षेत्रातील विविध महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा रविवारी शुभारंभ

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह खासदार पद्मभूषण सुधा मूर्ती, खासदार स्वाती मालीवाल यांची विशेष उपस्थिती

**बारामती (दै. संध्या)**



उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते बारामती येथील ग. दि. मा. सभागृह येथे रविवार, ५ जुलै २०२६ रोजी दुपारी 3 वाजता शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि आरोग्य क्षेत्रातील विविध महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा शुभारंभ होणार आहे.

या कार्यक्रमास राज्यसभेच्या खासदार व ज्येष्ठ समाजसेविका पद्मभूषण सुधा मूर्ती, खासदार स्वाती मालीवाल यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमात 'टू व्हील्स ऑफ होप-सायकल बँक' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरूवात केली जाणार असून, महाराष्ट्रातील एकलाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायकली पोहोचविण्याच्या मोहिमेच्या प्रारंभातून प्रतीकात्मक पद्धतीने २ हजार विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला गती देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेच्या २४० हून अधिक शाळांमध्ये डिजिटल वर्गखोली, ८० पेक्षा जास्त शाळांमध्ये स्टेम STEM प्रयोगशाळा आणि १० शाळांमध्ये पीय लॅब (Pi Lab) सुरू करण्यात येणार आहे. तसेच दोन शाळांना वॉश (WASH) (पाणी, स्वच्छता व शौचालय) सुविधा हस्तांतरीत करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुका (IUCAA) यांच्या सहकार्याने नासा (NASA), इस्त्रो (ISRO) आणि ईएसए ESA या संस्थांच्या शैक्षणिक भेटींसाठी सामंजस्य करारावर मार्गदर्शन व सहकार्य करणे अपेक्षित आहे. तसेच ज्ञानप्रबोधिनी, देश अपनाये सहयोग फाऊंडेशन, सेल्को (SELCO) आणि टीआयएसएस (TISS) यांसह विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी सामंजस्य करार केले जातील.

जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली हस्तलिखित पुस्तकांचे अनावरण करण्यात येणार आहे. भारत केअर्सकडून विद्यार्थ्यांसाठी पायलट शिष्यवृत्ती उपक्रमाची घोषणा करण्यात येणार आहे.

महिलांच्या आरोग्य व सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती' अंतर्गत 'गर्भाशयमुख कर्करोगमुक्त पुणे' जनजागृती मोहिमेची सुरूवात, महिला रुग्णालयासाठी बायोमेडीकल वेस्ट इन्साईनरेटर (Biomedical Waste Incinerator) यंत्राचे हस्तांतरण, MAATR ॲपच्या विस्तारित आवृत्तीचे लोकार्पण व 'आशा गाथा' महिला सक्षमीकरण गीताचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

यावेळी आदिशक्ती समन्वयकांना टॅब्लेट्स, स्वयंसेविकांना ई-बाईक्स व आशा व अंगणवाडी सेविकांना विविध साहित्य वितरण करण्यात येणार आहे. मासिक पाळी स्वच्छता व मानसिक आरोग्य या प्रशिक्षणांचा अभ्यास पूर्ण केलेल्या सेविकांना प्रमाणपत्रे प्रदान केली जातील.

याशिवाय बाल संगोपन योजना, एकल महिला घरकुल योजना, अनाथ प्रमाणपत्रे आणि एकल महिला बचत गटांना कर्ज मंजुरीपत्रांचे वितरण तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती येथे विद्यार्थी व युवकांसाठी 'क्रूझिंग सेफ' रस्ता सुरक्षा अनुभव केंद्राचे उद्घाटनही करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम ग्रामीण भागातील शिक्षण, महिला सक्षमीकरण, आरोग्य व तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दृष्टी देणारा ठरणार आहे.

> "पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संधी, अत्याधुनिक डिजिटल सुविधांचा व विज्ञानाधारित शिक्षणाचा लाभ देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. डिजिटल शाळा, स्टेम (STEM) प्रयोगशाळा, सायकल बँक, आरोग्य मोहिमा व विविध कल्याणकारी उपक्रम ग्रामीण समाजात सकारात्मक बदल घडवतील. या कार्यक्रमात खासकरून खासदार सुधा मूर्ती यांची उपस्थिती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल."
> **- श्री. गजानन पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद**

> "ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि प्रत्येक महिलेपर्यंत आरोग्य व सक्षमीकरणाच्या सुविधा पोहोचविणे हे जिल्हा परिषदेचे प्राथमिक ध्येय आहे. लोकसहभाग व विविध संस्थांच्या सहकार्याने पुणे जिल्हा परिषदेचा विकास नवा आदर्श स्थापेल, असा आमचा विश्वास आहे."
> **- श्री. वीरधवल जगदाळे, अध्यक्ष, पुणे जिल्हा परिषद**

## विद्यापीठ परीक्षेत समर्थ लॉ कॉलेजची यशस्वी भरारी

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील बेल्हा येथील समर्थ लॉ कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कवडे यांनी दिली. विविध वर्षांतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे : प्रथम वर्ष एलएलबी: या वर्गाचा निकाल तब्बल ९८.२९ टक्के लागला. निलेश हाडवळे (८.९२ एसजीपीए) याने प्रथम क्रमांक मिळवला. स्वप्नील घोलप (७.८४) याने द्वितीय, तर रविता दांगट (७.७५) आणि प्रमिला वाघोले (७.७५) यांनी संयुक्त तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम वर्ष बी.ए. एलएलबी: शामा मलिक (८.१३) आणि अक्षदा पोखरकर (८.१३) यांनी संयुक्त प्रथम क्रमांक मिळवला. विश्वजीत माने (८.००) व भावना पानसरे (८.००) यांनी संयुक्त द्वितीय, तर गौरी डुकरे (७.८८) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

द्वितीय वर्ष बी.ए. एलएलबी: या वर्गाचा निकाल १०० टक्के लागला. श्रुती काढणे (८.३३) हिने प्रथम, सिद्धी मोरे (८.२५) हिने द्वितीय, तर सिद्धी शेलोत (८.१३) हिने तृतीय क्रमांक मिळवला. तृतीय वर्ष बी.ए. एलएलबी: या वर्गाचा निकाल ९०.४७ टक्के लागला. स्नेहल कोहिनकर (७.५८) हिने प्रथम, सरोज राऊत (७.२५) हिने द्वितीय, तर आयाज मुलानी (७.१७) याने तृतीय क्रमांक मिळवला.

## १जुलै या राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून श्री महागणपती हॉस्पिटलमधील डॉक्टर्स जनजागृती सेवा संस्थेच्या "कृतज्ञता प्रमाणपत्राने" सन्मानित

**टिटवाळा (दै. संध्या)**



(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) भारतात दरवर्षी१जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा केला जातो. हा दिवस देशातील महान डॉक्टर आणि पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री डॉ.बिधान चंद्र रॉय यांच्या पुण्यतिथीनिमित्त समर्पित आहे.'ऋणसेवा हीच ईश्वर सेवा'असे मानत सर्व डॉक्टर्स निस्वार्थीपणे सेवा देत असतात.त्यांचा सन्मान व्हावा याच उद्देशाने१जुलै या राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून टिटवाळा येथील श्री महागणपती हॉस्पिटलमधील डॉक्टर्सना जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने'कृतज्ञता प्रमाणपत्राने'सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी स्वराज्य रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सुप्रिया आचरेकर, कल्याण-कसारा-कर्जत महिला रेल्वे प्रवासी संघटनेच्या समन्वयक आरती ताई भोईर,समाजसेविका स्वाती गोगटे, श्री महागणपती हॉस्पिटलचे विशेष कार्यकारी अधिकारी विक्रांत बापट यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.जनतेला निरोगी ठेवण्यासाठी डॉक्टर्स करत असलेल्या योगदानाबद्दल आणि प्रयत्नांबद्दल, अत्यंत कृतज्ञता व कौतुकासह प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या उपक्रमांसंदर्भात सविस्तर माहिती दिली,व संस्थेचा संक्षिप्त अहवाल त्यांना देण्यात आला.श्री. महागणपती हॉस्पिटलचे विशेष कार्यकारी अधिकारी विक्रांत बापट यांनी संपूर्ण हॉस्पिटलमधील विभागवार डॉक्टर्सना भेटवून संपूर्ण हॉस्पिटलमधील कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.महागणपती हॉस्पिटलमधील कर्मचारी वृंदांनी विशेष सहकार्य केले.

## दुकान फोडून १० इलेक्ट्रिक मोटार पंप लंपास करणारे तिघे जेरबंद

### तिघांना शिक्रापूर पोलिसांनी ठोकल्या बेड्या; एक लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**शिक्रापूर (दै. संध्या)**




रिपेरिंगसाठी दुकानात ठेवण्यात आलेले सुमारे एक लाख रुपये किमतीचे १० इलेक्ट्रिक मोटार पंप चोरी करणाऱ्या तिघा आरोपींना शिक्रापूर पोलिसांनी जेरबंद केले असून, त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रकरणी रामदास आनंदराव सासवडे यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३३१(४) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या दुकानाचे शटर उघडून आरोपींनी आत प्रवेश केला. दुकानात दुरुस्तीसाठी आलेले १० इलेक्ट्रिक मोटार पंप संगनमताने चोरून नेले. या प्रकरणातील मुख्य आरोपी अजय हनुमंत जाधव याने साथीदार संतोष बालाजी लोहार आणि वैभव अशोक घुमरे यांच्या मदतीने चोरीचा कट रचल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढला. आरोपी सणसवाडी परिसरातील एल अँड टी फाट्याजवळ असल्याची माहिती डायल ११२ पथकाला मिळाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तातडीने कारवाई करून अजय हनुमंत जाधव (वय २५), संतोष बालाजी लोहार (वय २४) आणि वैभव अशोक घुमरे (वय २१) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांना २९ जून रोजी अटक करण्यात आली. आरोपींना न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती. आरोपींकडून चोरीस गेलेले एक लाख रुपये किमतीचे १० इलेक्ट्रिक मोटार पंप जप्त करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस हवालदार आर. डी. मळेकर हे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

अधीक्षक डॉ.संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, सहायक पोलीस निरीक्षक भोसले, पोलीस हवालदार मळेकर, नितीन सुद्रीक तसेच पोलीस शिपाई नागेश वाघमारे, विकास बांगर, संतोष बाबर, ललित चक्रनारायण कृष्णा बडे यांच्या पथकाने केली.



## नारायणगाव येथे मुथ्था परिवारातर्फे मोफत शीत शवपेटीचे लोकार्पण

**नारायणगाव (दै. संध्या)**

सामाजिक बांधिलकी जपत नारायणगाव येथील मुथ्था परिवाराकडून नागरिकांच्या सेवेसाठी एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. स्वर्गीय दादी रखमाबाई नंदराम मुथ्था यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुथ्था परिवाराने नारायणगाव आणि परिसरातील नागरिकांसाठी एक अत्याधुनिक शीत शवपेटी (फ्रीझर बॉक्स) मोफत उपलब्ध करून दिली आहे. दुःखाच्या प्रसंगी कुटुंबाला आधार देण्याच्या उद्देशाने हा मानवतावादी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. अनेकदा अत्यंत दुःखद प्रसंगी काही कारणास्तव दूरचे नातेवाईक किंवा आप्तेष्ट दूरवरून येण्यास विलंब होतो. अशा कठीण वेळी मृतदेहाची हेळसांड होऊ नये आणि कुटुंबीयांना आपल्या प्रिय व्यक्तीचे अंतिम दर्शन शांततेत व सन्मानाने घेता यावे, यासाठी ही सोय करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे नारायणगावकर आणि संपूर्ण शिवजन्मभूमी परिसरासाठी ही शीत शवपेटी पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# आषाढी पायीवारीसाठी पुरंदरची आरोग्य यंत्रणा सज्ज

## झेंडेवाडी ते निरापर्यंत प्रत्येक दोन किलोमीटरवर आरोग्य पथके; १४८ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**नीरा (दै. संध्या)**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुरंदर तालुक्यातील आरोग्य विभागाने व्यापक नियोजन पूर्ण केले असून, झेंडेवाडी ते निरा या पालखी मार्गावर वारकऱ्यांना तत्पर आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विक्रम काळे यांनी दिली.

बुधवार (दि. ८) ते शनिवार (दि. २५) जुलैदरम्यान होणाऱ्या पालखी सोहळ्यात शनिवार (दि. ११) व रविवार (दि. १२) जुलै रोजी लाखो वारकरी पुरंदर तालुक्यातून मार्गक्रमण करणार आहेत. त्यांची आरोग्य सुरक्षितता लक्षात घेऊन पंचायत समिती पुरंदरच्या आरोग्य विभागाने विशेष उपाययोजना केल्या आहेत.

पालखी मार्गावरील गावांचे किटकशास्त्रीय सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून, सासवड व जेजुरी शहरांचाही त्यात समावेश आहे. किटकजन्य व संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी धूर फवारणी, विहिरींचे निर्जंतुकीकरण तसेच पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी सुरू आहे. यासाठी २६४ पाण्याचे नमुने आणि २९ टीसीएल नमुने राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविण्यात आले आहेत.

वारकऱ्यांना सुरक्षित अन्न मिळावे यासाठी पालखी मार्गावरील हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्री



केंद्रांची तपासणी करण्यात येत आहे. झेंडेवाडी, सासवड, जेजुरी, वाल्हा आणि निरा येथे तसेच पालखी मुक्कामस्थळी अतिदक्षता वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

संपूर्ण पालखी मार्गावर प्रत्येक दोन किलोमीटर अंतरावर आरोग्य सेवा पथके तैनात राहणार आहेत. झेंडेवाडी, दिवे, शिवरी, बेलसर फाटा, दौंडज, प्राथमिक आरोग्य केंद्र वाल्हा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र निरा येथे २४ तास वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय सासवड, ग्रामीण रुग्णालय जेजुरी, प्राथमिक आरोग्य केंद्र वाल्हा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र निरा येथे बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा अखंड सुरू राहणार असून, आपत्कालीन परिस्थितीसाठी औषधसाठा, वैद्यकीय साहित्य व प्रशिक्षित मनुष्यबळ सज्ज ठेवण्यात आले आहे.

पुणे परिमंडळाचे आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांच्या मार्गदर्शनाखाली, गटविकास अधिकारी प्रणोती श्रीश्रीमाळ आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विक्रम काळे यांच्या नेतृत्वाखाली ही तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे डॉ. काळे यांनी सांगितले.


### १४८ अधिकारी-कर्मचारी सेवेत

आषाढी पालखी सोहळ्यासाठी आरोग्य विभागाकडून १४८ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये ११ वैद्यकीय अधिकारी, २५ समुदाय आरोग्य अधिकारी, ७ पुरुष आरोग्य सहाय्यक, ४ महिला आरोग्य सहाय्यक, ३५ आरोग्य सेवक, २५ आरोग्य सेविका, ५ मिश्रक आणि ५ शिपाई यांचा समावेश आहे. हिवताप आरोग्य पर्यवेक्षक प्रकाश चवरे, हिवताप आरोग्य सहाय्यक राहुल टकले तसेच तालुका कार्यालयातील सहाय्यक शिवाजी भोसकर आणि दादासाहेब जगताप हे या पथकांच्या कामकाजाचा समन्वय करणार आहेत.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# राज्यात मोठी गुंतवणूक होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कॅनडातील क्यूबेक प्रांतांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र ही भारतामध्ये वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. देशात येणाऱ्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्के परकीय गुंतवणुक ही महाराष्ट्रात येते. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, क्वांटम कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, खाण संशोधन या क्षेत्रामध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असून महाराष्ट्र क्युबेकसोबत या क्षेत्रासाठी भागीदारी करण्यास तयार आहे. या भागीदारीतून राज्यात निश्चितच मोठी गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

कॅनडातील क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळासमवेत झालेल्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१८ मध्ये मॉन्ट्रियल येथे भेट दिली असता, त्यावेळी माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीनीकरणीय ऊर्जा, जैवतंत्रज्ञान तसेच आदिवासी कल्याण या विषयावर सामंजस्य करार करण्यात आले होते. हे करार महाराष्ट्र आणि क्यूबेकमधील संबंध अधिक दृढ असल्याचे प्रतीक आहे. तसेच नुकतेच कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या नेतृत्वात आलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाशी मुंबई भेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी विषयी सकारात्मक चर्चा झाली होती.

नवी मुंबईमध्ये एज्युसिटी उभारण्यात येत असून या ठिकाणी सर्व आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे.या एज्युसिटीमध्ये क्यूबेकमधील विद्यापीठांनी आपली दालने उघडून 'मायनिंग इंजीनियरिंग' या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम विशेषत्वाने सुरू करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यामध्ये पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसह वाढवण बंदर प्रकल्पावर काम सुरू आहे. राज्यामध्ये गुंतवणूक करून उद्योग उभारण्यासाठी सुलभ धोरण आहे.



राज्यातील गुंतवणूक ही दीर्घकालीन अनुकूल परिणाम देणारी आहे. 'क्रिटिकल आणि स्ट्रॅटेजिक मिनरल्स' मध्ये गुंतवणुकीची क्यूबेकमधील गुंतवणूकदारांना मोठी संधी आहे.

एरोस्पेस, डिफेन्स या क्षेत्रातही राज्यामध्ये मोठे काम होत आहे. नागपूर परिसरात 'डिफेन्स कॉरिडोर' ची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे एरोस्पेस क्षेत्राची परिसंस्था वेगाने विस्तारित होत आहे. त्याचप्रमाणे जीसीसी, डेटा सेंटर, बॅटरी स्टोरेज, कृषी मधील नवीन तंत्रज्ञान या क्षेत्रातही महाराष्ट्र पुढे येत आहे. त्यामुळे क्यूबेकने महाराष्ट्रसोबत दीर्घकालीन भागीदारी करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.

क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट म्हणाले की, क्यूबेक कॅनडामध्ये प्रगत राज्य असून कृत्रिम बुद्धिमत्ता, डाटा सेंटर, शिक्षण, क्रिटिकल मिनरल्स यामध्ये मोठी गुंतवणूक आहे. क्युबेक महाराष्ट्रासोबत विविध क्षेत्रांमध्ये भागीदारी करण्यास तयार आहे. पेन्शन फंड संस्थेच्या माध्यमातून भारतामध्ये मोठी गुंतवणूक करण्यास क्युबेकने तयारी केली आहे. भागीदारीच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यात रस असल्याचेही स्किट यांनी सांगितले.

यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबळगन, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे, कॅनडातील क्यूबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार सहाय्यक उपमंत्री डॉमिनिक मार्कोट्टे, सल्लागार श्रीमती लिया फर्टीन, संचालक मायकल कॉन्स्टेनिन, स्टीफन फलेक्कर, क्यूबेक प्रांतातील सीडीपीक्यू गुंतवणूक संस्थेचे भारतातील व्यवस्थापकीय संचालक नटराजन वेंकटरमण आदी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### राज्यात सात ठिकाणी वसतिगृह उभारणार

मुंबई (दैनिक संध्या) : जैन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणेसह राज्यातील एकूण सात ठिकाणी वसतिगृहे उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. बैठकीत महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज व व्याज परतावा योजनांच्या सुधारित प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच 'विहारधाम निर्माण योजना' आणि 'पाठशाळा आधुनिकीकरण व सक्षमीकरण योजना' राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ कडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वसतिगृह उभारणीसंदर्भात प्राप्त मागण्यांचा विचार करून राज्यातील सात ठिकाणी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, 'मराठी जैन साहित्य विश्वकोष' निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने जैन युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम तसेच इतर रोजगाराभिमुख योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष अभियान राविले जाणार असून महिला व बाल विकास विभागाच्या सहकार्याने महिला बचत गटांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्याबाबतही चर्चा झाली.

### घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई शहरासह रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये 4 ते 6 जुलै दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसेच, मध्य महाराष्ट्रातील सातारा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांच्या घाट परिसरातही या कालावधीत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. या कालावधीत स्थानिक प्रवासात अडथळे आणि काही प्रमाणात संरचनात्मक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी या काळात सतर्क राहावे. विशेषतः सखल भागांमध्ये आणि घाट रस्त्यांवर प्रवास करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक आपत्कालीन क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात येत आहे.

# डॉ. प्रभाकर कांबळे यांचा पुरस्काराने सन्मानित



■ मुंबई (दै. संध्या)

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्य गुणवंत कामगार असोसिएशन, महाराष्ट्र व जागृत नागरिक सेवा संस्था, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. विविध सामाजिक, सहकार, कामगार व सार्वजनिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ डॉ. प्रभाकर तुकाराम कांबळे यांना प्रतिष्ठेचा "राष्ट्रीय कोल्हापूर रत्न" पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच बोधी सामाजिक मंडळ, सम्यक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र सहदेव जाधव यांना "राष्ट्रीय समाजरत्न" पुरस्काराने गौरविण्यात आले. सहकार भूषण पुरस्काराने सीए किशोर बिंद, प्रशांतकुमार शेरवेगार, राजू सोनकांबळे, दिपक शिंगरे आणि बाळकृष्ण तावडे यांचा सन्मान करण्यात आला. कामगार भूषण पुरस्कार अष्टपैलू कलाकार व गुणवंत कामगार विद्याधर राणे यांना, केरबा डावरे यांना शाहू पुरस्कार व तुळशीदास सन्नकेना कोल्हापूर भूषण पुरस्कार कोल्हापूरचे खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज आणि आमदार सतेज उर्फ बंटी पाटीलआणि राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश केसरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.. यावेळी पुरस्कारार्थींना कोल्हापुरी फेटा, शाल, सन्मानचिन्ह, मेडल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रंगराव सावंत, सखाराम जाधव, अनिल म्हमाने व ज्येष्ठ सहकार तज्ञ डॉ प्रभाकर कांबळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश केसरकर यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज आणि आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांनी आपल्या मनोगतातून समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना अशा पुरस्कारांमुळे प्रेरणा मिळते, असे सांगून पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन उत्कृष्टरीत्या पार पडले. शेवटी संस्थेच्या सचिव अनिता काळे यांनी उपस्थित मान्यवर, पुरस्कारार्थी व सर्व उपस्थितांचे आभार मानले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या पुरस्कारप्राप्त सर्व मान्यवरांवर राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या सामाजिक, सहकार व जनसेवेतील योगदानाचे सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे.

# स्टिंग एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर दुष्परिणाम

■ शाळेच्या परिसरात 'एनर्जी ड्रिंक्स'ना बंदी

■ फ्लेवर पानांच्या नावाखाली अंमली पदार्थ विक्रीचीही चौकशी होणार : मंत्री नरहरी झिरवाळ



■ मुंबई (दै. संध्या)

सोशल मिडिया आणि टिव्हीवर मोठ्या प्रमाणात जाहिरात करण्यात येणाऱ्या स्टिंग या एनर्जी ड्रिंकच्या अतिसेवनामुळे अहिल्या नगर, पाथर्डी, श्रीगोंदा, या भागात शाळकरी मुलांचा हृदयाचे ठोके वाढल्याने मृत्यू झाल्याच्या घटना उघडकीय आल्या आहेत. शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन तरुणांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व अतिसेवनामुळे घातक ठरणाऱ्या 'एनर्जी ड्रिंक्स'च्या विक्रीवर शाळा कॉलेजच्या ५०० मीटर परिसरात विक्री करण्यास बंदी घालण्यात आल्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत केली. मंत्री झिरवाळ यांनी सांगितले की, राज्य सरकारने निर्बंध लागू केले आहेत. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या ५०० मीटर परिसरामध्ये या एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. तसेच, शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात 'फ्लेवर पानां'च्या नावाखाली होणारी अंमली पदार्थांची विक्री आणि फ्लेवर मिल्कच्या नावाखालील भेसळीची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, असे आश्वस्त करत मंत्र्यांनी यासाठी सध्या विशेष तपास मोहीम सुरू असल्याचे सभागृहात स्पष्ट केले.

विधानसभेत तारांकीत प्रश्नोत्तराच्या तासात भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी या संदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला. सोशल मिडियावरील जाहिरात होत असलेल्या शाळकरी मुलांचा मुद्दा मांडताना पाचपुते यांनी सांगितले की,"अहिल्यानगरमधील श्रीगोंदा आणि पाथर्डी या विभागात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकच्या अतिसेवनामुळे हृदयाचे ठोके अचानक वाढून मुलांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानी पोहोचवणारे कॅफिन, अतिप्रमाणातील साखर आणि 'कार्मोजिन' सारखे कृत्रिम रंग या पेयांमध्ये सर्रास वापरले जात आहेत. या ड्रिंकच्या बाटलीवर 'लहान मुलांसाठी हे पेय देऊ नये. असा इशारा असूनही शाळा-कॉलेजच्या कॅन्टीन व परिसरात त्याची दारूपेक्षाही घातक पद्धतीने विक्री होत आहे, असल्याचे त्यांनी सांगितले. यावर उत्तर देताना मंत्री झिरवाळ यांनी शाळेच्या आवारात ही पेये विकली जात असल्याची कबुली दिली आणि ५०० मीटरच्या आत अंमली पदार्थांसह सर्व प्रकारच्या एनर्जी ड्रिंक्सवर बंदी घालण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. याच मुद्द्याला पकडून आमदार राहुल कुल यांनी ऊर्जा देण्याच्या बहाण्याने शाळा परिसरात चालणाऱ्या इतर पेयांच्या विक्रीकडे लक्ष वेधले. "फ्लेवर पानांच्या नावाखाली शाळकरी मुलांना अंमली पदार्थ विकले जात आहेत. तसेच दुधाच्या भेसळीत फ्लेवर मिल्क म्हणून जास्त साखर आणि कृत्रिम द्रव्ये वापरून मुलांचे आरोग्य धोक्यात आणले जात आहे, याची सखोल चौकशी व्हावी," अशी मागणी कुल यांनी केली.

यावर उत्तरादाखल बोलताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, या गंभीर बाबींची दखल घेऊन वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या अंतर्गत सध्या विशेष तपासणी व कारवाईची मोहीम सुरू आहे. असे सांगितले.

### कॅफिनच्या मिश्रणाचे नियम काय?

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या नियमांचा हवाला देत मंत्र्यांनी लिखित उत्तरात स्पष्ट केले की, अशा कॅफिनेटेड पेयांमध्ये कॅफिनचे प्रमाण प्रति लिटर १४५ मिग्रॅ ते ३०० मिग्रॅच्या मर्यादित असणे बंधनकारक आहे. राज्यात एप्रिल २०२५ ते मे २०२६ दरम्यान घेतलेल्या विविध एनर्जी ड्रिंक्सच्या ११५ नमुन्यांपैकी काही नमुने कमी दर्जाचे आणि 'मिथ्याछाप' (मीसब्रँडेड) आढळले असून दोषींवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. शाळा आणि कॉलेजच्या कॅम्पस परिसरात यापुढे कोणत्याही आक्षेपार्ह जाहिराती व विक्री खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'महाकनेक्ट' संवादसेतू उपक्रमाद्वारे जागतिक मराठी मने जोडणार

## राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल : अमेरिकेतील मराठी समुदायांशी संवाद

■ जगभरातील मराठी माणूस हा महाराष्ट्राचा राजदूत

■ मुंबई (दै. संध्या)

जगभरात असलेल्या मराठी माणसाने आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील महाकनेक्ट या संवादसेतू उपक्रमाव्दारे जागतिक स्तरावरील ही मराठी मने जोडण्यासाठी, सहसंबंध अधिक दृढ करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला असल्याची माहिती राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे जागतिक मराठी समुदायाशी दूरदृष्य प्रणालीद्वारे संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजशिष्टाचार सचिव डॉ राजेश गवांदे, राजशिष्टाचार विभागाचे अधिकारी तसेच अमेरिकेतील विविध मराठी मंडळाचे पदाधिकारी दूरदृश्य प्रणाली वरून उपस्थित होते.

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, भारत आज जगातील मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत असून महाराष्ट्राचा यामध्ये मोठा वाटा आहे. विविध क्षेत्रात महाराष्ट्र वेगाने पुढे येत आहे. मराठी माणसाने आणि मराठी समुदायाने आपली



मराठी संस्कृती व परंपरा आपल्या कर्तृत्वाने आणि परिश्रमाने सातासमुद्रापार पोहोचवली आहे. राजशिष्टाचार विभागाच्या माध्यमातून परकीय थेट गुंतवणूक व प्रवासी भारतीय व्यवहार व संपर्क हे नवे विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. याअंतर्गत मराठी माणसाशी आणि समुदायाशी संवाद साधण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

मराठी माणूस संशोधन क्षेत्रातही आघाडीवर आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नेतृत्व करत आहे. नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात, उद्योग उभारणीत अग्रेसर आहे. जगभरातील मराठी माणूस हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक राजदूत आहे. तो महाराष्ट्राचा भविष्यातील भागीदार आहे. अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळाने अमेरिकेत मराठी भाषा, साहित्य, संस्कृती,कला, परंपरा व सण-उत्सव जतन करण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे राजशिष्टाचार मंत्री रावल यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जगभरातील भारतीय समुदायाशी आत्मीय नाते निर्माण केले आहे. याव्दारे त्यांनी भारतीय असण्याचा अभिमान अधिक दृढ केला आहे. याच विचारांतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महा-एनआरआय कनेक्ट- महाकनेक्ट या संवाद सेतू उपक्रमातून जगभरातील मराठी समुदायाला एका डिजिटल व्यासपीठावर एकत्र आणण्यात येणार आहे. हा संवादाचा मंच आहे. विश्वासाचा सेतू आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून गुंतवणूक, उद्योग, व्यापार, पर्यटन, स्टार्टअप्स, धोरणात्मक चर्चांमध्ये सहभाग, ज्ञानाची देवाणघेवाण, महाराष्ट्र मंडळांचे जागतिक नेटवर्क, सांस्कृतिक कार्यक्रम, युवकांचा सहभाग आणि शासनाशी थेट संवाद अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील असे राजशिष्टाचार मंत्री रावल यांनी सांगितले.

जागतिक स्तरावरील मराठी माणसांकडून आणि मराठी समुदायाकडून विविध क्षेत्रातील ज्ञान, अनुभव आणि सहसंबंध अधिक दृढ करण्यासाठी सूचना अपेक्षित आहेत. महाकनेक्ट या संवाद सेतू उपक्रमाव्दारे विविध क्षेत्रातील विषय हाताळण्यात येणार असल्याचे राजशिष्टाचार मंत्री रावल यांनी सांगितले. या संवाद कार्यक्रमात अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे प्रसाद पानवलकर यांच्यासह विजय चौथाईवाले, आनंद गानू तसेच गर्जे मराठी ग्लोबल, मराठी विश्व, महाराष्ट्र मंडळ, शिकागो, ऑस्टीन मराठी मंडळ, नॉर्थ अमेरिका फिल्म असोसिएशन, कनेक्टिकट महाराष्ट्र मंडळ, फिलाडेल्फिया महाराष्ट्र मंडळ, लास व्हेगास मराठी मंडळ, न्यू इंग्लंड मराठी, कॅर्लाईट मराठी मंडळ, पिटसबर्ग मराठी मंडळ, लास व्हेगास मराठी मंडळ, यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची चेंबूर येथील टाटा पॉवर प्लांटला भेट

■ मुंबई (दै. संध्या)

चेंबूर, माहूल रोड येथील टाटा थर्मल पॉवर कंपनीच्या जनरेशन स्टेशनला राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी भेट देऊन पाहणी केली. या दौऱ्याचा मुख्य उद्देश प्लांटमधील बॉयलरच्या वापराची प्रत्यक्ष पाहणी करणे आणि औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेणे होता. यावेळी उपसचिव दीपक पोकळे, बाष्पके संचालक धवल अंतापूरकर, तसेच चिवटे आदी उपस्थित होते.

टाटा पॉवरचे ट्रॉम्बे प्रमुख आशिष भट यांनी कामगार मंत्र्यांचे स्वागत करून त्यांना प्लांटचे दैनंदिन कामकाज, सध्या भेडसावणारी तांत्रिक आव्हाने आणि त्यावर प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या अत्याधुनिक उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. या भेटीदरम्यान कामगार मंत्र्यांनी प्लांटच्या कामकाजाशी संबंधित विविध क्लिष्ट तांत्रिक आणि व्यावसायिक बाबी सखोलपणे समजून घेतल्या. त्यांनी युनिट क्षमता, उपकरणांची कार्यक्षमता आणि वीज निर्मिती प्रक्रियेत खारट पाणी वापरताना येणाऱ्या अडचणी व आव्हाने याविषयी माहिती घेतली. सध्याच्या डिजिटल युगात औद्योगिक क्षेत्राला भेडसावणाऱ्या सायबर धोक्यांची दखल घेत मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी टाटा पॉवरच्या कामकाजावर होणाऱ्या



संभाव्य सायबर हल्ल्यांच्या परिणामांबाबत आणि त्यावरील खबरदारीबद्दलही चौकशी केली. प्लांट सुरक्षित ठेवण्यासाठी उभारण्यात आलेल्या मजबूत आणि अद्ययावत सायबर सुरक्षा यंत्रणेची माहिती घेत त्यांनी समाधान व्यक्त केले. याशिवाय, वाढत्या पर्यावरणपूरक पर्यायांमुळे भविष्यात निर्माण होणारी परिस्थिती, ग्रीडवर नवीकरणीय (रिन्यूएबल) ऊर्जा आणि इलेक्ट्रिकल वाहनांच्या (ईव्ही) वाढत्या वापरामुळे होणाऱ्या परिणामांबद्दल चर्चा केली. यावर ट्रॉम्बे प्रमुखांनी स्पष्ट केले की, या बदलांचा औष्णिक (थर्मल) प्लांटवर निश्चितच परिणाम होतो. विशेषतः वीज निर्मिती तांत्रिकदृष्ट्या किमान पातळीवर (तांत्रिक किमान मर्यादेपर्यंत) आणताना काही आव्हाने निर्माण होतात. औद्योगिक सुरक्षा आणि कामगारांच्या हिताला प्राधान्य देत प्लांटमधील सुरक्षा मानके अधिक बळकट करण्याच्या सूचना यावेळी कामगार मंत्री ॲड फुंडकर यांनी प्रशासनाला दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पुरोगामी विद्यालयाची राधिका कश्यप ठरली शिष्यवृत्ती धारक



हवेली (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२६ रोजी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (८वी) परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव या विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी राधिका श्रीकांत कश्यप ही विद्यार्थिनी संच सी या गटात पुणे जिल्ह्यातून सहाव्या क्रमांकाने शिष्यवृत्ती धारक झाली आहे. या गटासाठी ९५५ इतका कोटा आरक्षित होता. त्यामध्ये राधिकाने ६४% गुण मिळवत सहावा क्रमांक पटकावत शिष्यवृत्ती मिळवली. या यशाबद्दल पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे सचिव रंगनाथ आप्पा कड उपाध्यक्ष रामदास चौधरी व सर्व विश्वस्त तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी विद्यार्थीनीचे व तिला मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

### ध्यास फौंडेशनच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी

■ खेड तालुका गुणवत्ता यादीत चार विद्यार्थ्यांचा मानाचा ठसा

आळंदी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तालुका गुणवत्ता यादीत ध्यास फौंडेशन संचलित डॉ. माधवराव सानप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आळंदी देवाची येथील चार विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता आठवीमध्ये श्रेया सुरेश जंगले हिने तालुका गुणवत्ता यादीत २६२ वा क्रमांक मिळविला. तसेच वेद योगेश कुलकर्णी याने ३१० वा, तर साक्षी संतोष साबळे हिने ३४२ वा क्रमांक पटकावला. इयत्ता पाचवीमध्ये सान्वी संतोष मचे हिने १६२ वा क्रमांक मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक यशात मानाची भर घातली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. या यशाबद्दल संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले. भविष्यातही विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे शैक्षणिक क्षेत्रात उज्वल यश मिळवावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. या यशामुळे ध्यास फौंडेशनच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा पुन्हा अधोरेखित झाली असून, परिसरातून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### एकत्र रहात नसल्याच्या कारणावरुन महिलेवर चाकूने हल्ला; मुलीलाही पळविले

चाकण (दैनिक संध्या) : एकत्र रहात नसल्याच्या कारणावरून महिलेवर चाकूने हल्ला करून तिच्या मुलीला पळवून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खेड तालुक्यातील आंबेठाण गावचे हद्दीतील श्रीरामनगर येथे बुधवारी (दि.१) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आणि आरोपी चांगदेव नागनाथ मुंडे (वय - ३०, रा. मैंदवाडी, ता. धारूर, जि. बीड) हे गेल्या दोन वर्षांपासून एकत्र राहत होते. त्यांना स्वरा नावाची मुलगी आहे. मागील महिन्यापासून आरोपी चांगदेव हा दारूच्या नशेत फिर्यादी महिलेला वारंवार मारहाण करत होता. त्यामुळे ती त्याच्यापासून वेगळी राहत होती. याच रागातून आरोपी चांगदेव हा चाकू घेऊन तिच्याकडे आला. " एकत्र राहत नाहीस " या कारणावरून त्याने महिलेच्या डाव्या छातीवर चाकूने वार करून तिला गंभीर जखमी केले. त्यानंतर आरोपीने मुलगी स्वराला सोबत घेऊन घटना स्थळावरून पलायन केले. जखमी महिलेवर उपचार सुरू आहेत. उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा पदग्रहण समारंभ संपन्न



जुन्नर (दैनिक संध्या) : रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१ अंतर्गत कार्यरत रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या रौप्य महोत्सवी वर्ष २०२६-२७ च्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता महालक्ष्मी लॉन्स, शिवनेरी रोड, बारव, जुन्नर येथे संपन्न झाला. या समारंभात प्रशांत खत्री हे अध्यक्षपदी,पवन गाडेकर हे सचिवपदी, तर विकी पंजवानी यांनी कोषाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली असून वर्ष २०२६-२७ च्या संचालक मंडळाचाही पदग्रहण सोहळा संपन्न झाला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी भूषण डॉक्टर सुनील शेवाळे होते तर असिस्टंट गव्हर्नर शिवाजी टाकळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. रोटरीच्या कार्याबद्दल विनायक कर्पे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं रोटरी वर्ष २०२५-२६ चे . हस्ते नव्या कार्यकारिणीकडे पदभार सुपूर्द करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाची सुरुवात या पदग्रहण समारंभातून होत असून, समाजोपयोगी सेवा प्रकल्प, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि युवक विकास या क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी मांडण्यात आला.

# सासवडमध्ये माणकोजी महाराज बोधले पुण्यतिथी उत्साहात

**जगताप मंडळींतर्फे विशेष उपक्रमांचे आयोजन**

सासवड (दै. संध्या)

सासवड येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिर आणि संत सोपानकाका समाधी मंदिरात सतराव्या शतकातील थोर संत माणकोजी महाराज बोधले यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. समस्त जगताप मंडळींच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्याने सासवडकर भाविक भारावून गेले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी भैरवनाथ मंदिरातील ओवरीमध्ये असलेल्या संत माणकोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली . त्यानंतर संत सोपानकाका समाधी मंदिरात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून सोपानदेवांच्या समाधीस नवीन पोशाख अर्पण करण्यात आला. यानिमित्त ह.भ.प. अभय जगताप यांचे 'धन्य ते संसारी | दयावंत जे अंतरी' या अभंगावर कीर्तन झाले. आपल्या कीर्तनातून त्यांनी माणकोजी महाराजांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत स्वतःचे धान्य गोरगरिबांना वाटून त्यांचे



सासवड येथील संत सोपानकाका समाधी मंदिरात माणकोजी महाराज बोधले यांच्या प्रतिमेचे पूजन करताना जगताप कुटुंबीय व उपस्थित भाविक.

प्राण वाचवणाऱ्या आणि पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात भाविकांसाठी पाणीपुरवठ्याची सोय करणाऱ्या महाराजांच्या परोपकारी वृत्तीवर त्यांनी प्रकाश टाकला. बार्शी तालुक्यातील धामणगाव येथे महाराजांची समाधी असून, त्यांच्या या थोर कार्याची माहिती भाविकांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी, समस्त जगताप मंडळींच्या वतीने संत सोपानकाका देवस्थानचे विश्वस्त गौतम महाराज गोसावी, इतर विश्वस्त आणि सेवाधारी मंडळींचा विशेष सत्कार करण्यात आला. आरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यासाठी बाजीराव जगताप, प्रदीप जगताप, वामन जगताप, ह.भ.प. अभय जगताप, महेश जगताप, पांडुरंग जगताप, अनिल जगताप, संजय जगताप, सुरेश जगताप, नंदकुमार जगताप, राजन जगताप, अभिजित जगताप, अजय जगताप, संभाजी जगताप व राजेंद्र सोळसकर यांच्यासह मोठ्या संख्येने जगताप कुटुंबीय व ग्रामस्थ उपस्थित होते.

## चार वर्षाच्या चिमुकल्याच्या हत्येप्रकरणी आरोपीस जन्मठेप

राजगुरुनगर (दै. संध्या)

■ खेड जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. सय्यद यांचा निकाल

चार वर्षाच्या चिमुकल्याच्या हत्येप्रकरणी आरोपी सचिन दत्तात्रय पिंगळे (वय ४६, रा. आंबेडकरनगर, चाकण) याला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेप आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी हा निकाल दिला.

खेड तालुक्यातील चाकण येथे २०१६ मध्ये शेजारी राहणाऱ्या चार वर्षांच्या मुलाचा सचिन दत्तात्रय पिंगळे (वय ४६, रा. आंबेडकरनगर, चाकण) या आरोपीने निर्घृण खून केला होता. या खटल्यातील माहितीनुसार, ५ एप्रिल २०१६ रोजी संजोग उर्फ बंकू संजय भोंडवे (वय ४ वर्षे) याला खेळण्यासाठी आरोपीने आणि त्याच्या अल्पवयीन मुलीने दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास आपल्या घरी बोलावून नेले होते. संजोगची आई त्याला पाठविण्यास तयार नसतानाही त्याला बळजबरीने घेऊन गेल्याचा आरोप आहे. सायंकाळपर्यंत संजोग घरी न परतल्याने त्याच्या आई, वडील व भावाने शोधाशोध सुरू केली. आरोपीच्या घरी विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. मात्र शेजाऱ्यांनी संजोग आरोपीच्या घरात गेल्याचे आणि बाहेर न आल्याचे सांगितले. त्यानंतर नातेवाईक व परिसरातील नागरिक आरोपीच्या घरात शोध घेण्यासाठी गेले. सुरुवातीला आरोपी व त्याच्या मुलीने घरात शोध घेण्यास विरोध केला. शोधादरम्यान घरातील बेडरूममध्ये असलेल्या भूमिगत पाण्याच्या टाकीकडे संशय गेला. टाकीचे झाकण उघडण्यास आरोपीने तीव्र विरोध केला. मात्र उपस्थितांनी झाकण उघडून पाहिले असता टाकीतील पाण्यात संजोगचा मृतदेह आढळून आला. त्याला तत्काळ खासगी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

शवविच्छेदन अहवालात संजोगचा मृत्यू नाक व तोंड दाबल्याने झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर चाकण पोलिसांनी गुन्हा दाखल करून तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांनी तपास करून आरोपीला अटक केली. हा खटला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात चालला. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील संदीप वाघ यांनी प्रभावी बाजू मांडली.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रींचे दर्शनाकरीता भाविकांची गर्दी

जुन्नर (दै. संध्या)

शुक्रवार दि.०३ जुलै २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील ‘श्री गिरीजात्मज’ गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थीमुळे दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने सकाळी ०६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, विश्वस्त सदाशिव ताम्हाणे तसेच खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हनुमंत अनंत कड व त्यांच्या पत्नी नंदाताई हनुमंत कड यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टी चतुर्थीनिमित्त ‘श्री गिरिजात्मज’ गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता दौंड येथील शैलेश दवे यांनी २ कॅरेट केळी प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमीत्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्टमार्फत विविध सोयी



सुविधा पुरविण्यात आल्या. संकष्टी चतुर्थीमुळे दिवसभर भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर जुन्नर येथील अमित शंकर चवरे यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## कारगिल युद्धातील वीरपुत्राला पिंगोरकरांचा मानाचा सलाम

शहीद लान्सनाईक शंकर राजाराम शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुष्पचक्र अर्पण; ग्रामस्थ, माजी सैनिक व कुटुंबीय आठवणीने भारवले

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील पिंगोरी गावाने कारगिल युद्धातील वीरपुत्र, शहीद लान्सनाईक शंकर राजाराम शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी (३ जुलै) कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही शहीद स्मारकासमोर ग्रामस्थ, माजी सैनिक आणि शहीदांच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत पुष्पचक्र अर्पण करून त्यांच्या अद्वितीय शौर्याला मानवंदना देण्यात आली.

पिंगोरीचे सुपुत्र शहीद लान्सनाईक शंकर राजाराम शिंदे यांनी १९९९ च्या कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी शौर्याने लढत सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या पराक्रमामुळे पिंगोरी गावासह संपूर्ण महाराष्ट्राला आणि देशाला त्यांचा अभिमान आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन



राहाव्यात, तसेच देशभक्तीची प्रेरणा नव्या पिढीला मिळावी, या भावनेतून गावात दरवर्षी स्मृतिदिन साजरा केला जातो.

यंदाच्या अभिवादन कार्यक्रमात शहीदांचे पुत्र रणजीत शिंदे व सागर शिंदे यांच्या उपस्थितीत माजी सैनिक कर्नल शामराव शिंदे आणि महादेव शिंदे यांच्या हस्ते शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

यावेळी पिंगोरीचे सरपंच संदीप यादव, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य जीवन शिंदे, पोलीस पाटील राहुल शिंदे, माजी सैनिक राजेंद्र शिंदे, वसंत शिंदे, शंताराम शिंदे, अमोल शिंदे, मोहन शिंदे, गोरख शिंदे, मुबारक इनामदार, सागर सुतार, सतीश शिंदे, दत्ताराजे शिंदे, प्रवीण शिंदे, निनाद शिंदे, ठकसेन भोसले, शरद गायकवाड, प्रदीप गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद शिंदे यांनी केले.

संपूर्ण कार्यक्रमात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, उपस्थितांनी शहीद शंकर शिंदे यांच्या शौर्याला कृतज्ञतापूर्वक सलाम करत त्यांच्या बलिदानाची प्रेरणा सदैव जिवंत ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## श्रद्धांजलीऐवजी आरोग्य जनजागृती; दशक्रियाविधीत अनोखा उपक्रम

जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर तालुका पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष तसेच निसर्ग अभ्यासक यश मस्करे यांचे वडील वनाधिकारी स्व. तुकाराम पांडुरंग मस्करे यांच्या दशक्रियाविधी निमित्त पारंपरिक श्रद्धांजलीपर भाषणांना फाटा देत आरोग्य विषयक जनजागृती व्याख्यानाचे



आयोजण केले होते. या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी ज्ञानेश्वरीचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ कवी उत्तम सदाकाळ यांनी 'बाप' ही हृदयस्पर्शी कविता सादर केली, पसायदानाने सांगता झाली. यानंतर स्मशानभूमी परिसरात वडाचे झाड लावण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. राऊत यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्येही हृदयविकाराचे प्रमाण वाढत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. हृदयविकार टाळण्यासाठी नियमित शारीरिक व मानसिक व्यायाम करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच कोणत्याही आजाराकडे दुर्लक्ष न करता तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा. हृदयविकाराचा झटका किंवा सर्पदंश झाल्यास रुग्णाला योग्य उपचार वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, रुग्णाला हलवताना विशेष काळजी घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

# संत सोपानकाका पालखीचा जुनामार्ग प्रशासनाने केला खुला

**मागील अनेक वर्षापासून हा मार्ग होता बंद**

नीरा (दै. संध्या)

नीरा येथील जुना संत सोपानकाका पालखी मार्ग अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर आता वाहतूकसाठी खुला करण्यात आला आहे.वाल्हे मंडळाचे मंडल अधिकारी प्रमोद झुरुंगे यांच्या उपस्थितीत व मोजणी विभागाच्या मार्गदर्शनाखाली हा मार्ग मोकळा करण्यात आला. शेताकऱ्यांनीही कोणत्याही अडथळ्याशिवाय शेजारील दोन्ही गटातून दहा फुटाचा वीस फुटाचा रस्ता करण्यास मान्यता दिली. व आपले अतिक्रमण काढून घेतले. पुण्याच्या पुरंदर तालुक्यातील नीरा येथून बारामती तालुक्यातील निंबुतकडे जाणारा संत सोपानकाकांचा पालखीमार्ग (ग्रामीण मार्ग क्रमांक 296) हा गेल्या अनेक वर्षापासून बंद होता. संत सोपानकाका हा पालखी सोहळा नीरा शहरातून बारामतीकडे जात असल्याने या मार्गाकडे दुर्लक्ष केलं जात होतं.

पूर्वी संत सोपान काका पालखी सोहळा याच मार्गाने बारामतीकडे नीरा येथील मुख्य गावठाण शिवतक्रारवाडी आणि नीरा रेल्वे स्टेशन या दोन्ही लोकवस्तीच्या मध्यातून हा रस्ता जात आहे. अनेक वर्ष या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे या रस्त्यावर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले होते. त्याचबरोबर या रस्त्याची दुरुस्ती देखील करण्यात आली नव्हती. मात्र पालखी सोहळ्यातील वाढती गर्दी पाहता सामाजिक कार्यकर्त्यांच्या व पुरंदर महसूल विभागाच्या पुढाकारातून हा मार्ग आता खुला करण्यात आलाय यामुळे नीरा शरातील पालखी काळातील गर्दी कमी होण्यास मदत होणार असून स्थानिक लोकांना देखील या रस्त्याचा उपयोग होणार आहे.

मीरा येथील भाजपचे कार्यकर्ते योगेंद्र माने त्याचबरोबर महेश गेले अरविंद जेथे सचिन धायगुडे संजय कोकरे राहुल काळे या ग्रामस्थांनी हा रस्ता खुला करण्याची मागणी



केली होती त्यांच्या मागणीनुसार विक्रम राजपूत यांनी हा रस्ता खुला करण्यासंदर्भात आदेश दिले होते त्यांच्या आदेशानुसार मंडलाधिकारी प्रमोद झुरुंगे, पिंपरे व नीरा गावचे महसूल अधिकारी. तलाठी मयूर पाटोळे, पल्लवी नारळे निरेचे प्रभारी पोलिस पाटील राहुल शिंदे, कोतावाल आप्पा लकडे समाधान सोनवणे, नीरा ग्रामपंचायत कर्मचारी सचिन ठोंबरे पोलिस प्रशासन त्यांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातला करण्यात आला यावेळी योगेंद्र माने ॲड. पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब गार्डी, सुदाम बंडगर, मच्छिंद्र लकडे, हेमंत गायकवाड,प्रकाश बंडगर, पिंपरेचे सरपंच राजेंद्र गायकवाड, विराज चव्हाण, समाधान सोनवणे विजय बंडगर, आनंदा डोंबाळे उपस्थित होते.

> शासनाची सध्या पानंद रस्ता खुला करण्याची मोहीम सुरु आहे. नीरा येथील नीरा व पिंपरे खुर्द शिवरस्ता खुला करण्यात आला आहे. त्याच बरोबर पिंपरे खुर्द नीरा निंबुत हा जिल्हा मार्ग अनेक वर्षांपासून बंद होता तो देखील खुला करण्यात आला. लोकांनी या वेळी सहकार्य करत प्रशासनाला चांगले सहकार्य केले. **- प्रमोद झुरुंगे (मंडल अधिकारी वाल्हे )**
>
> युतीशासनाच्या धोरणनुसार सध्या राज्यात पानंद रस्ते खुले केले जात आहेत. त्याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. शेतकऱ्याचा शेतमाल बाजारपेठेत पोहचवण्यासाठी या रस्त्यांचा उपयोग होत आहे. त्याच बरोबर रस्त्याचे अनेक वादही महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या या योजनेमुळे मार्गी लागले आहेत. **- येगेंद्र माने (संघटक, भाजपा)**

# नीरा खोऱ्यात पावसाची हजेरी

## धरणांच्या पाणीसाठ्यात वाढीला सुरुवात

**गतवर्षीच्या तुलनेत साठा अजूनही खूपच कमी; शेतकऱ्यांच्या नजरा आगामी जोरदार पावसाकडे**

नीरा (दै. संध्या)



नीरा खोऱ्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने पुन्हा जोर धरल्याने धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होण्यास किंचितशी सुरुवात झाली आहे. शुक्रवारी (३ जुलै) सायंकाळी ४ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार भाटघर, नीरादेवघर, वीर आणि गुंजवणी या चार प्रमुख धरणांमध्ये एकूण ६.२९५ टीएमसी (१३.०२ टक्के) पाणीसाठा झाला असून, गेल्या २४ तासांत ०.५०९ टीएमसी पाण्याची आवक झाली आहे. मात्र, ही स्थिती मागील वर्षाच्या तुलनेत अद्यापही चिंताजनक आहे.

मागील वर्षी याच दिवशी या चारही धरणांमध्ये २७.०३६ टीएमसी (५५.९४ टक्के) पाणीसाठा उपलब्ध होता. त्याच्या तुलनेत यंदाचा साठा तब्बल २०.७४१ टीएमसीने कमी असून, पाणीसाठ्याची टक्केवारीही मागील वर्षी पेक्षा सुमारे ४३ टक्क्यांनी घटली आहे. त्यामुळे यंदा मान्सून उशिरा सक्रिय झाल्याचा परिणाम धरणसाठ्यावर स्पष्टपणे दिसून येत आहे.

धरणनिहाय विचार करता, नीरादेवघर धरण परिसरात सर्वाधिक ७६ मिमी पावसाची नोंद झाली असून तेथे १.६६८ टीएमसी (१४.२१ टक्के) पाणीसाठा आहे. या धरणात ३५२ क्युसेक पाण्याची आवक सुरू आहे. भाटघर धरणात पावसाची नोंद नसली तरी २.३०३ टीएमसी (९.८० टक्के) साठा असून १४६ क्युसेक आवक सुरू आहे. वीर धरण परिसरात ७ मिमी पाऊस झाला असून धरणात १.६५० टीएमसी (१७.५४ टक्के) साठा आणि ११ क्युसेक आवक आहे. गुंजवणी धरण परिसरात ४१ मिमी पाऊस झाला असून धरणातील पाणीसाठा ०.६७४ टीएमसी (१८.२६ टक्के) आहे.

सध्या नीरा खोऱ्यात पावसाने चांगली सुरुवात केली असून, आगामी काही दिवसांतही पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पिण्याच्या पाण्याबरोबरच खरीप हंगामासाठीही हा पाऊस महत्त्वाचा मानला जात असून शेतकऱ्यांच्या नजरा आता मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लागल्या आहेत.